रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 2
Part XII Section 2
भाग बारा अनुभाग 2

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2 ] | नई दिल्ली, जून 12-18, 2025/ज्येष्ठ 22-28 (शक) 1947 | [खंड 22 |
| No. 2 ] | NEW DELHI, JUNE 12-18, 2025/JYESHTHA 22-28 (SAKA) 1947 | [Vol. 22 |
| अं. २ ] | नवी दिल्ली, जून १२-१८, २०२५/ज्येष्ठ २२-२८ (शके) १९४७ | [खंड २२ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

**विधि और न्याय मंत्रालय**

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, 1962 ; (2) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, 2005 ; (3) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, 2007 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962 ; (2) The Disaster Management Act, 2005 ; (3) The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि पेट्रोलियम ॲन्ड मिनरल्स् पाइपलाईन्स् (ॲक्विझिशन् ऑफ राइटस् ऑफ यूझर इन लॅन्ड) ॲक्ट, १९६२ ; (२) दि डिझास्टर मॅनिजमेन्ट ॲक्ट, २००५ ; (३) दि नॅशनल इन्स्टिट्युटस् ऑफ टेक्नॉलॉजी, सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च ॲक्ट, २००७ यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

## निर्देशसूची

## INDEX



| अनुक्रमांक<br>Serial No.<br>(१) | अधिनियमाचे नाव<br>Name of the Act<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>Page No.<br>(३) |
|---|---|---|
| १ | पेट्रोलियम व खनिज वाहिन्या (जमिनीतील वापर हक्काचे संपादन) अधिनियम, १९६२<br>The Petroleum and Minerals Pipelines (Acquisition of Right of User in Land) Act, 1962. | ५ |
| २ | आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.<br>The Disaster Management Act, 2005. | १५ |
| ३ | राष्ट्रीय तंत्रज्ञान, विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था अधिनियम, २००७.<br>The National Institutes of Technology, Science Education and Research Act, 2007. | ४५ |

# आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५

**(२००५ चा अधिनियम ५३)**

[१७/९/२०२४ रोजी यथाविद्यमान]

[२३ डिसेंबर, २००५.]

आपत्तींच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो, केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास[१] अंमलात येईल ; आणि या अधिनियमाच्या विभिन्न तरतुदींसाठी आणि विभिन्न राज्यांसाठी वेगवेगळे दिनांक* नियत करता येतील, आणि कोणत्याही राज्याच्या संबंधातील या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या प्रारंभाच्या कोणत्याही निर्देशाचा, त्या राज्यातील त्या तरतुदीच्या प्रारंभाचा निर्देश म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "बाधित क्षेत्र" याचा अर्थ, आपत्तीमुळे बाधित झालेले देशाचे क्षेत्र किंवा भाग, असा आहे ;

(ख) "क्षमता निर्माण" यामध्ये,—

(एक) विद्यमान साधनसंपत्ती आणि संपादित करावयाची किंवा निर्माण करावयाची साधनसंपत्ती निश्चित करण्याचा ;

(दोन) उप-खंड (एक) अन्वये निश्चित केलेली साधनसंपत्ती संपादित करण्याचा किंवा ती निर्माण करण्याचा ;

(तीन) आपत्तींच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी कर्मचारीवर्गाची रचना करण्याचा व प्रशिक्षण देण्याचा आणि अशा प्रशिक्षणाचे समन्वयन करण्याचा,

समावेश होतो ;

(ग) "केंद्र सरकार" याचा अर्थ, आपत्ती व्यवस्थापनावर प्रशासकीय नियंत्रण असलेले भारत सरकारचे मंत्रालय किंवा विभाग, असा आहे ;

(घ) "आपत्ती" याचा अर्थ, ज्याचा परिणाम, मोठ्या प्रमाणावर जीवित हानीस किंवा मानवी यातनास, किंवा मालमत्तेच्या हानीस किंवा नाशास, किंवा पर्यावरणाच्या हानीस किंवा ऱ्हासास कारणीभूत होतो असे नैसर्गिक अथवा मानवनिर्मित कारणांमुळे, किंवा अपघातामुळे अथवा निष्काळजीपणामुळे उद्‌भवणारे आणि बाधित क्षेत्रांतील समाजाच्या तोंड देण्याच्या क्षमतेच्या बाहेर असेल असे स्वरूप किंवा तीव्रता असलेले, कोणत्याही क्षेत्रातील भीषण संकट, दुर्घटना, आपत्ती, गंभीर घटना, असा आहे ;

---

१. २८ जुलै, २००६ (कलमे २, ३, ४, ५, ६, ८, १०, ७५, ७७, ७९), अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश, १२१६ (ई), दिनांक २८ जुलै, २००६ पहा ;

* १ ऑगस्ट, २००७ [कलमे १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३८, ३९, ४०, ४१, ४८, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, कलम ७० चे पोट-कलम (२), ७१, ७२, ७३, ७४, ७८, ७९] अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश, ७२२ (ई), दिनांक ७ मे, २००७ पहा;

* १७ मार्च, २००८ (कलमे ४४, ४५) अधिसूचना क्रमांक ५१७ (ई), दिनांक १७ मार्च, २००८ पहा ;

* १८ ऑक्टोबर, २०११ (कलम ४६) अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश २३९७ (ई), दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ पहा, भारताचे **राजपत्र**, असाधारण, भाग दोन, अनुभाग ३ (दोन) पहा.

* ५ फेब्रुवारी, २०२१ कलम ४७ चे पोट-कलम (१) अधिसूचना क्रमांक स्थायी आदेश ५६४ (ई), दिनांक ५ फेब्रुवारी, २०२१ पहा, भारताचे **राजपत्र**, असाधारण, भाग दोन, अनुभाग ३ (दोन) पहा.

(ङ) “आपत्ती व्यवस्थापन” याचा अर्थ,—

(एक) कोणत्याही आपत्तीचा धोका किंवा संकट यास प्रतिबंध घालणे ;

(दोन) कोणत्याही आपत्तीची जोखीम किंवा तिची तीव्रता किंवा परिणामकता सौम्य किंवा कमी करणे ;

(तीन) क्षमतावर्धन करणे ;

(चार) कोणतीही आपत्ती हाताळण्यासाठी सुसज्जता राखणे ;

(पाच) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला तत्परतेने प्रतिसाद देणे ;

(सहा) कोणत्याही आपत्तीच्या परिणामांची तीव्रता किंवा व्याप्ती निर्धारित करणे ;

(सात) निर्वासन, बचाव व मदतकार्य हाती घेणे ;

(आठ) पुनर्वसन व पुनर्रचना करणे,

यांसाठी ज्या आवश्यक किंवा इष्ट आहेत अशा नियोजन, संघटन, समन्वयन व अंमलबजावणीविषयक उपाययोजना करण्याची अखंडित व एकात्मीकृत प्रक्रिया, असा आहे ;

(च) “जिल्हा प्राधिकरण” याचा अर्थ, कलम २५ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेले जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, असा आहे ;

(छ) “जिल्हा योजना” याचा अर्थ, कलम ३१ अन्वये तयार केलेली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना, असा आहे ;

(ज) “स्थानिक प्राधिकरण” यामध्ये, कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्रात, नागरी सेवांचे नियंत्रण व व्यवस्थापन यांसह किंवा अत्यावश्यक सेवा देण्यासाठी, त्या त्या वेळी कायद्याद्वारे विनिहित केलेल्या, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या, पंचायती राज संस्था, नगरपालिका, जिल्हा मंडळ, कटक मंडळ, नगर रचना प्राधिकरण किंवा जिल्हा परिषद किंवा इतर कोणतीही संस्था किंवा प्राधिकरण, असा आहे ;

(झ) “निवारण” याचा अर्थ, आपत्तीची किंवा धोकादायक आपत्कालीन परिस्थितीची जोखीम, आघात किंवा प्रभाव कमी करण्यासाठी योजिलेल्या उपाययोजना, असा आहे ;

(ञ) “राष्ट्रीय प्राधिकरण” याचा अर्थ, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, असा आहे ;

(ट) “राष्ट्रीय कार्यकारी समिती” याचा अर्थ, कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली राष्ट्रीय प्राधिकरणाची कार्यकारी समिती, असा आहे ;

(ठ) “राष्ट्रीय योजना” याचा अर्थ, कलम ११ अन्वये संपूर्ण देशासाठी तयार केलेली आपत्ती व्यवस्थापन योजना, असा आहे ;

(ड) “सुसज्जता” याचा अर्थ, धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला आणि तिच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सज्ज राहण्याची स्थिती, असा आहे ;

(ढ) “विहित” याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ण) “पुनर्रचना” याचा अर्थ, आपत्तीनंतर कोणत्याही मालमत्तेची उभारणी किंवा पुन:स्थापना, असा आहे ;

(त) “साधनसंपत्ती” यामध्ये, मनुष्यबळ, सेवा, सामग्री व अन्नसामग्री यांचा समावेश होतो ;

(थ) “राज्य प्राधिकरण” याचा अर्थ, कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, असा आहे आणि त्यामध्ये, त्या कलमान्वये संघ राज्यक्षेत्राकरिता घटित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा समावेश होतो ;

(द) " राज्य कार्यकारी समिती " याचा अर्थ, कलम २० च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली एखाद्या राज्य प्राधिकरणाची कार्यकारी समिती, असा आहे ;

(ध) " राज्य शासन " याचा अर्थ, आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशासकीय नियंत्रण असलेला, राज्य शासनाचा विभाग, असा आहे आणि त्यामध्ये, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतीने नियुक्त केलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या प्रशासकाचा समावेश होतो ;

(न) " राज्य योजना " याचा अर्थ, कलम २३ अन्वये संपूर्ण राज्याकरिता तयार केलेली आपत्ती व्यवस्थापन योजना, असा आहे.

प्रकरण दोन

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना.**

**३.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीत नियत करील अशा दिनांकापासून, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणून संबोधले जाणारे एक प्राधिकरण स्थापन करण्यात येईल.

(२) राष्ट्रीय प्राधिकरण, अध्यक्ष, व केंद्र सरकारकडून विहित करण्यात येतील असे नऊ पेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य यांचे मिळून बनलेले असेल, आणि नियमांद्वारे अन्यथा तरतूद केली नसेल तर, राष्ट्रीय प्राधिकरणामध्ये पुढीलप्रमाणे अध्यक्ष व सदस्य यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) भारताचा पंतप्रधान, जो राष्ट्रीय प्राधिकरणाचा पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे नऊ पेक्षा अधिक नसणारे इतर सदस्य.

(३) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षास, पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याला राष्ट्रीय प्राधिकरणाचा उपाध्यक्ष म्हणून पदनिर्देशित करता येईल.

(४) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे, असतील.

**राष्ट्रीय प्राधिकरणाच्या बैठका.**

**४.** (१) राष्ट्रीय प्राधिकरण, आवश्यकता असेल तेव्हा आणि राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल.

(२) राष्ट्रीय प्राधिकरणाचा अध्यक्ष, राष्ट्रीय प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

(३) जर कोणत्याही कारणास्तव, राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षास राष्ट्रीय प्राधिकरणाच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित राहणे अशक्य असेल तर, राष्ट्रीय प्राधिकरणाचा उपाध्यक्ष, त्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

**राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती.**

**५.** केंद्र सरकार, राष्ट्रीय प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे अधिकारी, सल्लागार व कर्मचारी राष्ट्रीय प्राधिकरणाला पुरवील.

**राष्ट्रीय प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.**

**६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, राष्ट्रीय प्राधिकरण, आपत्तीस वेळेवर व प्रभावीपणे प्रतिसाद देण्याबाबत सुनिश्चिती करण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापनविषयक धोरणे, योजना व मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करण्यासाठी जबाबदार असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, राष्ट्रीय प्राधिकरणास,—

(क) आपत्ती व्यवस्थापनाबाबतची धोरणे निर्धारित करता येतील ;

(ख) राष्ट्रीय योजनेला मान्यता देता येईल ;

(ग) भारत सरकारच्या मंत्रालयांनी किंवा विभागांनी राष्ट्रीय योजनेनुसार तयार केलेल्या योजनांना मान्यता देता येईल ;

(घ) राज्य योजना तयार करताना राज्य प्राधिकरणांनी अनुसरावयाची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील ;

(ङ) भारत सरकारच्या विविध मंत्रालयांच्या किंवा विभागांच्या विकास योजनांमध्ये किंवा प्रकल्पांमध्ये आपत्तीचा प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिच्या परिणामांचे निवारण करण्यासाठी उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांनी अनुसरावयाची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील ;

(च) आपत्ती व्यवस्थापनाचे धोरण व योजना यांच्या कार्यान्वयनाचे व अंमलबजावणीचे समन्वयन करता येईल ;

(छ) निवारणाच्या प्रयोजनार्थ निधीची तरतूद करण्याची शिफारस करता येईल ;

(ज) केंद्र सरकारद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा मोठ्या आपत्तींमुळे बाधित झालेल्या इतर देशांना अशी मदत पुरविता येईल ;

(झ) आपत्तीस प्रतिबंध करणे किंवा तिचे निवारण करणे किंवा धोकादायक आपत्कालीन परिस्थितीचा किंवा आपत्तीचा सामना करण्यासाठी सुसज्जता राखणे आणि क्षमतावर्धन करणे, यांकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा उपाययोजना हाती घेता येतील ;

(ञ) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या कामकाजासाठी व्यापक धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील.

(३) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या अध्यक्षास, आकस्मिक प्रसंगी, राष्ट्रीय प्राधिकरणाचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार वापरण्याचा अधिकार असेल परंतु, अशा अधिकारांचा वापर हा, राष्ट्रीय प्राधिकरणाने कार्योत्तर अनुसंमती देण्याच्या अधीन असेल.

**राष्ट्रीय प्राधिकरणाने सल्लागार समिती घटित करणे.**

**७.** (१) राष्ट्रीय प्राधिकरणास, आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध पैलूंबाबत शिफारशी करण्यासाठी, आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील आणि राष्ट्रीय, राज्य किंवा जिल्हा स्तरावरील आपत्ती व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या तज्ज्ञांचा समावेश असलेली एक सल्लागार समिती घटित करता येईल.

(२) सल्लागार समितीच्या सदस्यांना, राष्ट्रीय प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील असे भत्ते प्रदान करण्यात येतील.

**राष्ट्रीय कार्यकारी समिती घटित करणे.**

**८.** (१) केंद्र सरकार, या अधिनियमाखालील राष्ट्रीय प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यात त्याला साहाय्य करण्यासाठी कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर तात्काळ, एक राष्ट्रीय कार्यकारी समिती घटित करील.

(२) राष्ट्रीय कार्यकारी समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(क) आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशासकीय नियंत्रण असलेल्या केंद्र सरकारच्या मंत्रालयाचा किंवा विभागाचा प्रभार असणारा, भारत सरकारचा सचिव, जो पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) कृषि, अणुऊर्जा, संरक्षण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पर्यावरण व वने, वित्त (व्यय), आरोग्य, ऊर्जा, ग्रामविकास, विज्ञान व तंत्रज्ञान, अवकाश, दूरसंचार, नगरविकास, जल संपदा यांचे प्रशासकीय नियंत्रण असलेले, भारत सरकारच्या मंत्रालयांचे किंवा विभागांचे सचिव आणि कर्मचारी समितीच्या प्रमुखांपैकी एकात्मीकृत संरक्षण कर्मचारी वर्गाचा प्रमुख, जो पदसिद्ध सदस्य असेल.

(३) राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या अध्यक्षास, राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्यासाठी केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य सरकारच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याला बोलावता येईल आणि तो राष्ट्रीय प्राधिकरणाशी विचारविनिमय करून केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील, अशा अधिकारांचा वापर करील व अशी कार्ये पार पाडील.

(४) राष्ट्रीय कार्यकारी समितीने आपल्या अधिकारांचा वापर करताना व आपली कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती ही, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशी असेल.

**उपसमित्या घटित करणे.**

**९.** (१) राष्ट्रीय कार्यकारी समितीस, आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, तिला जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा, एक किंवा अधिक उप-समित्या घटित करता येतील.

(२) राष्ट्रीय कार्यकारी समिती, आपल्या सदस्यांमधून, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उप-समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती करील.

(३) कोणत्याही उप-समितीमध्ये तज्ज्ञ म्हणून सहयोगी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येतील असे भत्ते प्रदान करण्यात येतील.

**राष्ट्रीय कार्यकारी समितीचे अधिकार व कार्ये.**

**१०.** (१) राष्ट्रीय कार्यकारी समिती, त्याची कार्ये पार पाडण्यामध्ये राष्ट्रीय प्राधिकरणाला सहाय्य करील व तिच्यावर राष्ट्रीय प्राधिकरणाची धोरणे व योजना यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असेल आणि ती देशातील आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारने दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्याची सुनिश्चिती करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, राष्ट्रीय कार्यकारी समितीस,—

(क) आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वयन व संनियंत्रण संस्था म्हणून कार्य करता येईल ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाने मान्यता द्यावयाची राष्ट्रीय योजना तयार करता येईल ;

(ग) राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये समन्वयन साधता येईल व संनियंत्रण करता येईल ;

(घ) भारत सरकारच्या विविध मंत्रालयांमार्फत किंवा विभागांमार्फत व राज्य प्राधिकरणांमार्फत आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील ;

(ङ) राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्य शासनांच्या व राज्य प्राधिकरणांच्या, आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यासाठी त्यांना आवश्यक ते तांत्रिक साहाय्य पुरविता येईल ;

(च) भारत सरकारच्या मंत्रालयांनी किंवा विभागांनी तयार केलेल्या राष्ट्रीय योजनेची व योजनांची अंमलबजावणी करण्याचे संनियंत्रण करता येईल ;

(छ) मंत्रालयांनी किंवा विभागांनी, त्यांच्या विकास योजना व प्रकल्प यांमध्ये आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या व तिचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याकरिता राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करता येईल ;

(ज) सरकारच्या विविध मंत्रालयांनी किंवा विभागांनी व अभिकरणांनी हाती घ्यावयाच्या निवारण व सुसज्जताविषयक उपाययोजनांच्या संबंधात संनियंत्रण करता येईल, समन्वय साधता येईल किंवा निदेश देता येतील ;

(झ) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्याच्या प्रयोजनार्थ सर्व शासकीय स्तरांवरील सुसज्जतेचे मूल्यमापन करता येईल आणि अशा सुसज्जतेत वाढ करण्यासाठी आवश्यक असेल तेथे निदेश देता येतील ;

(ञ) विविध स्तरांवरील अधिकारी, कर्मचारी व स्वेच्छेने बचावकार्य करणारे कार्यकर्ते यांच्यासाठी विशेष आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आखता येतील व त्यात समन्वयन साधता येईल ;

(ट) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या वेळी किंवा आपत्तीच्या प्रसंगी प्रतिसाद देताना समन्वयन साधता येईल ;

(ठ) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देताना, भारत सरकारची संबंधित मंत्रालये किंवा विभाग, राज्य शासने व राज्य प्राधिकरणे यांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजनांसंबंधात त्यांच्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील, किंवा निदेश देता येतील ;

(ड) तातडीने प्रतिसाद देण्याच्या, बचाव व मदत कार्य करण्याच्या प्रयोजनांसाठी, शासनाचे कोणतेही विभाग किंवा अभिकरण यांच्याकडे जे उपलब्ध असेल असे मनुष्यबळ किंवा साधनसामग्री राष्ट्रीय प्राधिकरणाला किंवा राज्य प्राधिकरणांना उपलब्ध करून देण्यासाठी, त्यांना फर्मावता येईल ;

(ढ) भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग, राज्य प्राधिकरणे, वैधानिक संस्था, इतर शासकीय किंवा अशासकीय संघटना आणि आपत्ती व्यवस्थापनामध्ये काम करणारे इतर घटक यांना सल्ला देता येईल, सहाय्य करता येईल व त्यांच्या कार्यांचे समन्वयन साधता येईल ;

(ण) या अधिनियमाखालील त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी राज्य प्राधिकरणे व जिल्हा प्राधिकरणे यांना आवश्यक ते तांत्रिक साहाय्य पुरविता येईल किंवा सल्ला देता येईल ;

(त) आपत्ती व्यवस्थापनाच्या संबंधात सर्वसाधारण शिक्षण व जनजागृती करण्यास चालना देता येईल ; आणि

(थ) जी कार्य करण्यासाठी राष्ट्रीय प्राधिकरण तिला फर्मावील अशी इतर कार्ये पार पाडता येतील.

**राष्ट्रीय योजना.**

**११.** (१) संपूर्ण देशासाठी राष्ट्रीय योजना म्हणून संबोधण्यात यावयाची एक आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यात येईल.

(२) राष्ट्रीय कार्यकारी समिती, राष्ट्रीय धोरण विचारात घेऊन आणि राज्य शासनांशी व आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील तज्ज्ञ संस्थांशी किंवा संघटनांशी विचारविनिमय करून, राष्ट्रीय प्राधिकरणाने मान्यता द्यावयाची, एक राष्ट्रीय योजना तयार करील.

(३) राष्ट्रीय योजनेत पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(क) आपत्तींचा प्रतिबंध करण्यासाठी, किंवा त्यांच्या परिणामांचे निवारण करण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजना ;

(ख) विकास योजनांमधील निवारण उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्यासाठी हाती घ्याव्याच्या उपाययोजना ;

(ग) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितींना किंवा आपत्तीला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी, सुसज्जता ठेवण्यासाठी व क्षमताबांधणी करण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजना ;

(घ) खंड (क), (ख) व (ग) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांबाबत भारत सरकारच्या विविध मंत्रालयांच्या किंवा विभागांच्या भूमिका व जबाबदाऱ्या.

(४) राष्ट्रीय योजनेचा दरवर्षी आढावा घेण्यात येईल व ती अद्ययावत करण्यात येईल.

(५) राष्ट्रीय योजनेअंतर्गत करावयाच्या उपाययोजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे समुचित तरतुदी करण्यात येतील.

(६) पोट-कलमे (२) व (४) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या राष्ट्रीय योजनेच्या प्रती, भारत सरकारच्या मंत्रालयांना किंवा विभागांना उपलब्ध करून देण्यात येतील आणि अशी मंत्रालये किंवा विभाग, राष्ट्रीय योजनेच्या अनुसार आपल्या स्वतःच्या योजना तयार करतील.

**किमान प्रमाणभूत अनुतोषासाठी मार्गदर्शक तत्त्वे.**

**१२.** राष्ट्रीय प्राधिकरण, आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना पुरवावयाच्या किमान प्रमाणभूत अनुतोषासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांची शिफारस करील, त्यामध्ये, पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(एक) निवारा, अन्न, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा व स्वच्छता यासंबंधात मदत छावण्यांमध्ये पुरवावयाच्या किमान आवश्यक गोष्टी ;

(दोन) विधवा व अनाथ मुले यांच्याकरिता करावयाच्या विशेष तरतुदी ;

(तीन) जीवित हानीबाबत अनुग्रहपूर्वक साहाय्य तसेच घरांच्या नुकसानीबाबत आणि उपजीविकेच्या साधनांचे पुनःस्थापन करण्यासाठी साहाय्य ;

(चार) आवश्यक असेल अशी इतर मदत.

**कर्जाची परतफेड, इत्यादीसाठी मदत करणे.**

**१३.** राष्ट्रीय प्राधिकरणास, अत्यंत भीषण आपत्तींच्या प्रसंगी आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना, उचित असतील अशा सवलतीच्या अटींवर कर्जांची परतफेड करण्यास मदत करण्यासाठी किंवा नवीन कर्जे देण्यासाठी शिफारस करता येईल.

प्रकरण तीन

## राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**१४.** (१) प्रत्येक राज्य शासन, कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर, होईल तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाच्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने राज्यासाठी एक राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करील. **राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना.**

(२) राज्य प्राधिकरण, अध्यक्ष व राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील असे नऊपेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य यांचे मिळून बनलेले असेल आणि नियमांद्वारे अन्यथा तरतूद केली नसेल तर, राज्य प्राधिकरण पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) राज्याचा मुख्यमंत्री, जो पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे आठपेक्षा अधिक नसतील इतके इतर सदस्य ;

(ग) राज्य कार्यकारी समितीचा अध्यक्ष, जो पदसिद्ध सदस्य असेल.

(३) राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षास, पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याला उपाध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करता येईल.

(४) राज्य कार्यकारी समितीचा अध्यक्ष, राज्य प्राधिकरणाचा पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असेल :

परंतु, दिल्ली संघ राज्यक्षेत्र वगळता, विधानसभा असलेल्या संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत, मुख्यमंत्री हा, या कलमान्वये स्थापन केलेल्या प्राधिकरणाचा अध्यक्ष असेल, आणि इतर संघ राज्यक्षेत्रांच्या बाबतीत, नायब राज्यपाल किंवा प्रशासक हा, त्या प्राधिकरणाचा अध्यक्ष असेल :

परंतु आणखी असे की, दिल्ली संघ राज्यक्षेत्राचा नायब राज्यपाल हा, राज्य प्राधिकरणाचा अध्यक्ष असेल आणि त्याचा मुख्यमंत्री हा, उपाध्यक्ष असेल.

(५) राज्य प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे, असतील.

**१५.** (१) राज्य प्राधिकरण, जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा आणि राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षास योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल. **राज्य प्राधिकरणाच्या बैठका.**

(२) राज्य प्राधिकरणाचा अध्यक्ष, राज्य प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

(३) जर, कोणत्याही कारणास्तव राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षास, राज्य प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहणे अशक्य असेल तर, राज्य प्राधिकरणाचा उपाध्यक्ष, त्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

**१६.** राज्य शासन, राज्य प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे अधिकारी, सल्लागार व कर्मचारी राज्य प्राधिकरणाला पुरवील. **राज्य प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती.**

**१७.** (१) राज्य प्राधिकरणास, त्याला जेव्हा आवश्यकता वाटेल तेव्हा, आपत्ती व्यवस्थापनाच्या विभिन्न पैलूंबाबत शिफारसी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील आपत्ती व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या आणि तज्ज्ञांचा अंतर्भाव असणारी एक सल्लागार समिती घटित करता येईल. **राज्य प्राधिकरणाने सल्लागार समिती घटित करणे.**

(२) सल्लागार समितीच्या सदस्यांना, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील असे भत्ते देण्यात येतील.

**१८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, राज्य प्राधिकरणाची, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी धोरणे व योजना निर्धारित करण्याची जबाबदारी असेल. **राज्य प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.**

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, राज्य प्राधिकरणास,—

(क) राज्य आपत्ती व्यवस्थापन धोरण निर्धारित करता येईल ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्य योजनेला मान्यता देता येईल ;

(ग) राज्य शासनाच्या विभागांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनांना मान्यता देता येईल ;

(घ) राज्य शासनाच्या विभागांनी त्यांच्या विकास योजना व प्रकल्प यांमध्ये आपत्तींचा प्रतिबंध करण्यासाठी व त्यांचे निवारण करण्यासाठीच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याच्या प्रयोजनांकरिता त्या विभागांनी अनुसरण करावयाची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील आणि त्यासाठी आवश्यक ते तांत्रिक साहाय्य पुरविता येईल ;

(ङ) राज्य योजनेच्या अंमलबजावणीचे समन्वयन करता येईल ;

(च) निवारण व सुसज्जता उपाययोजनांसाठी निधीची तरतूद करण्याची शिफारस करता येईल ;

(छ) राज्याच्या विविध विभागांच्या विकास योजनांचा आढावा घेता येईल आणि त्यामध्ये, प्रतिबंध व निवारण उपाययोजनांचे एकात्मीकरण केले आहे, याची सुनिश्चिती करता येईल ;

(ज) निवारण, क्षमताबांधणी व सुसज्जता यांसाठी राज्य शासनाच्या विभागांकडून हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेता येईल आणि आवश्यक असेल त्याप्रमाणे अशी मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील.

(३) राज्य प्राधिकरणाच्या अध्यक्षास, आकस्मिक प्रसंगी, राज्य प्राधिकरणाचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार वापरण्याचा अधिकार असेल, परंतु अशा अधिकारांचा वापर हा, राज्य प्राधिकरणाने कार्योत्तर अनुसंमती देण्याच्या अधीन असेल.

**राज्य प्राधिकरणाच्या किमान प्रमाणभूत अनुतोषासाठी मार्गदर्शक तत्त्वे.**

**१९.** राज्य प्राधिकरण, राज्यातील आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींकरिता पुरविण्यात येणाऱ्या प्रमाणभूत अनुतोषाची तरतूद करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करील :

परंतु, असे प्रमाण, कोणत्याही बाबतीत, यासंबंधात राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमधील किमान प्रमाणापेक्षा कमी असणार नाहीत.

**राज्य कार्यकारी समिती घटित करणे.**

**२०.** (१) राज्य शासन, कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्याच्या लगतनंतर, या अधिनियमान्वये राज्य प्राधिकरणाची कार्ये पार पाडताना त्याला साहाय्य करण्यासाठी आणि राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कारवाई करण्याबाबत समन्वयन साधण्यासाठी आणि राज्य शासनाने दिलेल्या निदेशांच्या अनुपालनाची सुनिश्चिती करण्यासाठी एक राज्य कार्यकारी समिती घटित करील.

(२) राज्य कार्यकारी समिती, पुढील सदस्यांनी मिळून बनलेली असेल :—

(क) राज्य शासनाचा मुख्य सचिव, जो पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) राज्य शासनाला योग्य वाटतील अशा विभागांचे राज्य शासनाचे चार सचिव, जे पदसिद्ध सदस्य असतील.

(३) राज्य कार्यकारी समितीचा अध्यक्ष, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील, आणि राज्य प्राधिकरणाद्वारे त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा अन्य अधिकारांचा वापर करील व अशी कार्ये पार पाडील.

(४) राज्य कार्यकारी समितीने आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कार्ये पार पाडताना, अनुसरावयाची कार्यपद्धती ही, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**राज्य कार्यकारी समितीने उप-समित्या घटित करणे.**

**२१.** (१) राज्य कार्यकारी समितीस, तिची कार्ये कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी, तिला जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा एक किंवा अनेक उप-समित्या घटित करता येतील.

(२) राज्य कार्यकारी समिती, तिच्या सदस्यांमधून पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उप-समितीच्या अध्यक्षाची नियुक्ती करील.

(३) कोणत्याही उप समितीमध्ये तज्ज्ञ म्हणून सहयोगी असलेल्या कोणत्याही व्यक्तीला राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील असे भत्ते प्रदान करण्यात येतील.

**राज्य कार्यकारी समितीची कार्ये.**

**२२.** (१) राज्य कार्यकारी समितीची, राष्ट्रीय योजनेची व राज्य योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असेल आणि ती राज्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी समन्वयन व संनियंत्रण करणारी संस्था म्हणून काम करील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, राज्य कार्यकारी समितीस,—

(क) राष्ट्रीय धोरण, राष्ट्रीय योजना व राज्य योजना यांच्या अंमलबजावणीचे समन्वयन व संनियंत्रण करता येईल ;

(ख) वेगवेगळ्या स्वरूपाच्या आपत्तींच्या संबंधात राज्याच्या विविध भागांची आपत्ती प्रवणता तपासता येईल आणि त्यांचा प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचे निवारण करण्यासाठी उपाययोजना विनिर्दिष्ट करता येतील ;

(ग) राज्य शासनाच्या विभागांनी व जिल्हा प्राधिकरणांनी आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील ;

(घ) राज्य शासनाच्या विभागांनी व जिल्हा प्राधिकरणांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करता येईल ;

(ङ) विभागांनी त्यांच्या विकास योजनांमध्ये व प्रकल्पांमध्ये आपत्तींचा प्रतिबंध व तिचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याकरिता राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करता येईल ;

(च) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तींस प्रतिसाद देण्याकरिता सर्व शासकीय किंवा अशासकीय स्तरांवरील सुसज्जतेचे मूल्यमापन करता येईल आणि अशा सुसज्जतेमध्ये वाढ करण्यासाठी आवश्यकता असेल तेथे निदेश देता येतील ;

(छ) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी, प्रतिसाद देताना, समन्वयन साधता येईल ;

(ज) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देताना हाती घ्यावयाच्या कारवाईसंबंधी राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा राज्यातील अन्य कोणत्याही प्राधिकरणाला किंवा संस्थेला निदेश देता येतील ;

(झ) ज्यास राज्याचे वेगवेगळे भाग आपत्तीप्रवण आहेत त्या आपत्तींचे स्वरूप आणि त्या आपत्तींस प्रतिबंध करण्यासाठी अशा आपत्तींचे निवारण करण्यासाठी आणि प्रतिसाद देण्यासाठी अशा समाजाकडून हाती घेता येतील अशा उपाययोजना यांसंबंधी सर्वसाधारण शिक्षण, जनजागृती आणि समाजाचे प्रशिक्षण करण्यास चालना देता येईल ;

(ञ) आपत्ती व्यवस्थापनाचे काम करीत असलेले, राज्य शासनाचे विभाग, जिल्हा प्राधिकरणे, वैधानिक संस्था आणि इतर शासकीय व अशासकीय संघटना यांना सल्ला देता येईल, त्यांना सहाय्य करता येईल आणि त्यांच्या कार्यांचे समन्वयन साधता येईल ;

(ट) जिल्हा प्राधिकरणांना व स्थानिक प्राधिकरणांना, त्यांची कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक साहाय्य किंवा सल्ला देता येईल ;

(ठ) आपत्ती व्यवस्थापनाच्या संबंधातील सर्व वित्तीय बाबींसंबंधात राज्य शासनाला सल्ला देता येईल ;

(ड) राज्यातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील बांधकामाची तपासणी करता येईल आणि आपत्तीस प्रतिबंध करण्याकरिता अशा बांधकामासाठी निर्धारित केलेल्या मानकांचे पालन केले जात नाही किंवा पालन करण्यात आलेले नाही असे तिचे मत असेल तर, अशा मानकांचे पालन करण्यासाठी आवश्यक असेल अशी कारवाई करण्याचे निदेश, जिल्हा प्राधिकरणाला किंवा, यथास्थिति, स्थानिक प्राधिकरणाला देता येतील ;

(ढ) राष्ट्रीय प्राधिकरणाला, आपत्ती व्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या पैलूंविषयी माहिती देता येईल ;

(ण) राज्य स्तरावरील प्रतिसाद योजना व मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील, त्यांचे पुनर्विलोकन करता येईल व ती अद्ययावत करता येतील आणि जिल्हा स्तरावरील योजना तयार करण्यात आल्या आहेत, त्यांचे पुनर्विलोकन करण्यात आले आहे व त्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत, याची सुनिश्चिती करता येईल ;

(त) संदेशवहन यंत्रणा सुस्थितीत आहे व आपत्ती व्यवस्थापन सराव नियत कालांतराने केले जात आहेत, याची सुनिश्चिती करता येईल ;

(थ) राज्य प्राधिकरणाने तिला नेमून देण्यात येतील किंवा त्याला आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये पार पाडता येतील.

**राज्य योजना.** **२३.** (१) प्रत्येक राज्याकरिता राज्य आपत्ती व्यवस्थापन योजना म्हणून संबोधण्यात यावयाची एक आपत्ती व्यवस्थापन योजना असेल.

(२) राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन आणि स्थानिक प्राधिकरणे, जिल्हा प्राधिकरणे व राज्य कार्यकारी समितीस योग्य वाटतील असे लोकप्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर राज्य कार्यकारी समितीद्वारे, राज्य योजना तयार करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये राज्य कार्यकारी समितीने तयार केलेल्या राज्य योजनेस, राज्य प्राधिकरणाची मान्यता घेण्यात येईल.

(४) राज्य योजनेमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल,—

(क) वेगवेगळ्या स्वरूपाच्या आपत्तींच्या संबंधात राज्याच्या वेगवेगळ्या भागांची आपत्तीप्रवणता ;

(ख) आपत्तींचा प्रतिबंध करण्यासाठी व तिचे निवारण करण्यासाठी अंगीकारावयाच्या उपाययोजना ;

(ग) निवारण उपाययोजनांमध्ये ज्या रीतीने विकास योजना व प्रकल्प यांचे एकात्मीकरण करण्यात येईल ती रीत ;

(घ) क्षमतावर्धन आणि हाती घ्यावयाच्या सुसज्जताविषयक उपाययोजना ;

(ङ) वरील खंड (ख), (ग) व (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांच्या संबंधातील राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाच्या भूमिका व जबाबदाऱ्या ;

(च) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्यामधील राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागांची भूमिका व जबाबदाऱ्या.

(५) राज्य योजनेचे दरवर्षी पुनर्विलोकन करण्यात येईल व ती अद्ययावत करण्यात येईल.

(६) राज्य योजनेअंतर्गत करावयाच्या उपाययोजनांकरिता वित्तव्यवस्था करण्यासाठी राज्य शासनाद्वारे समुचित तरतुदी करण्यात येतील.

(७) पोट-कलम (२) व (५) मध्ये निर्दिष्ट केलेल्या राज्य योजनेच्या प्रती, राज्य शासनाच्या विभागांना उपलब्ध करून देण्यात येतील आणि असे विभाग, राज्य योजनेअनुसार त्यांच्या स्वतःच्या योजना आखतील.

**धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या प्रसंगी राज्य कार्यकारी समितीचे अधिकार व कार्ये.** **२४.** आपत्तीमुळे बाधित झालेल्या समाजाला सहाय्य करण्याच्या आणि त्यांचे संरक्षण करण्याच्या किंवा अशा समाजाला मदत करण्याच्या किंवा कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या विध्वंसाला प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यांचा मुकाबला करण्याच्या किंवा तिच्या परिणामांचा सामना करण्याच्या प्रयोजनार्थ राज्य कार्यकारी समितीस,—

(क) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्राकडे, त्या क्षेत्राकडून किंवा त्या क्षेत्रांमधील होणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवता येईल आणि निर्बंध घालता येतील ;

(ख) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या प्रवेशावर, तेथील तिच्या हालचालीवर आणि तेथून बाहेर पडण्यावर नियंत्रण ठेवता येईल आणि निर्बंध घालता येतील ;

(ग) ढिगारे उपसता येतील, शोधकार्य करता येईल आणि बचाव कार्ये पार पाडता येतील ;

(घ) राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मानकांनुसार निवारा, अन्न, पिण्याचे पाणी, अत्यावश्यक अन्नसामग्री, आरोग्यविषयक देखभाल आणि सेवा पुरविता येतील ;

(ङ) बचाव कार्य, निर्वासन किंवा जीव अथवा मालमत्ता वाचविण्यासाठी तातडीने मदत करणे यांसाठी समितीला आवश्यक वाटतील अशा उपाययोजना किंवा उपाय योजण्यासाठी राज्य शासनाच्या संबंधित विभागाला, कोणत्याही जिल्हा प्राधिकरणाला किंवा राज्याच्या स्थानिक सीमांमधील इतर प्राधिकरणाला निदेश देता येईल ;

(च) तातडीचा प्रतिसाद, बचाव व मदत कार्य करण्याच्या प्रयोजनांसाठी संसाधने उपलब्ध करून देण्यास, राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा इतर कोणत्याही संस्थेला किंवा प्राधिकरणाला किंवा कोणतीही संबंधित संसाधने ताब्यात असणाऱ्या व्यक्तीला फर्माविता येईल ;

(छ) बचाव व मदत कार्यासाठी आपत्ती क्षेत्रातील तज्ज्ञांना व सल्लागारांना, सल्ला व साहाय्य देण्याकरिता फर्माविता येईल ;

(ज) आवश्यकता वाटेल त्याप्रमाणे व तेव्हा तेव्हा कोणत्याही प्राधिकरणाकडील किंवा व्यक्तीकडील सोयीसुविधांचा अनन्य किंवा अधिमान्य वापर करून घेता येईल ;

(झ) तात्पुरत्या पुलांचे किंवा इतर आवश्यक संरचनांचे बांधकाम करता येईल आणि जनतेला धोकादायक असतील अशा असुरक्षित संरचना पाडून टाकता येतील ;

(ञ) अशासकीय संघटना, समन्याय्य व भेदभावरहित रीतीने त्यांचे कामकाज पार पाडीत असल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(ट) कोणतीही धोकादायक आपत्कालीन परिस्थिती किंवा आपत्ती हाताळण्यासाठी जनतेत माहितीचा प्रसार करता येईल ;

(ठ) या संबंधात केंद्र सरकार किंवा राज्य शासन निदेश देईल असे उपाय योजता येतील किंवा कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या स्वरूपामुळे आवश्यक असलेले किंवा खात्रीलायक असे इतर उपाय योजता येतील.

प्रकरण चार

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण घटित करणे.**

**२५.** (१) प्रत्येक राज्य शासन, कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण स्थापन करील.

(२) जिल्हा प्राधिकरण हे, अध्यक्ष व राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा सातपेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल, आणि नियमांद्वारे अन्यथा तरतूद केली नसेल तर, ते, पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क) जिल्ह्याचा जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, उप आयुक्त, जो पदसिद्ध अध्यक्ष असेल ;

(ख) स्थानिक प्राधिकरणाचा निवडून आलेला प्रतिनिधी, जो पदसिद्ध सह-अध्यक्ष असेल :

परंतु, संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेल्या जनजाती क्षेत्रांमध्ये, स्वायत्त जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी सदस्य हा, पदसिद्ध सह-अध्यक्ष असेल ;

(ग) जिल्हा प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, पदसिद्ध सदस्य ;

(घ) पोलीस अधीक्षक, पदसिद्ध सदस्य ;

(ङ) जिल्ह्याचा मुख्य वैद्यकीय अधिकारी, पदसिद्ध सदस्य ;

(च) राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोनपेक्षा अधिक नसतील इतके जिल्हा स्तरावरील इतर अधिकारी.

(३) जेथे जिल्हा परिषद अस्तित्वात असेल अशा कोणत्याही जिल्ह्यामध्ये, त्या जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा जिल्हा प्राधिकरणाचा सह-अध्यक्ष असेल.

(४) राज्य शासन, राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी कार्ये पार पाडण्यासाठी आणि जिल्हा प्राधिकरणाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि अशी इतर कार्ये पार पाडण्यासाठी, जिल्हा प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जिल्ह्याच्या अपर जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अपर जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या किंवा, यथास्थिति, अपर उप आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्याची नियुक्ती करील.

**जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षाचे अधिकार.**

**२६.** (१) जिल्हा प्राधिकरणाचा अध्यक्ष, जिल्हा प्राधिकरणाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषविण्याव्यतिरिक्त, जिल्हा प्राधिकरण त्याच्याकडे सोपवील अशा, जिल्हा प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील.

(२) जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षास, निकडीच्या प्रसंगी, जिल्हा प्राधिकरणाच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार असेल, परंतु, अशा अधिकारांचा वापर, जिल्हा प्राधिकरणाने कार्योत्तर अनुसंमती देण्याच्या अधीन असेल.

(३) जिल्हा प्राधिकरणाला किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या अध्यक्षास, सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे, पोट-कलम (१) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२) खालील, प्राधिकरणाचे किंवा त्याचे असे अधिकार व कार्ये, प्राधिकरणाला किंवा त्याला योग्य वाटतील, अशा शर्तींच्या व मर्यादांच्या, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, जिल्हा प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

**बैठका.**

**२७.** जिल्हा प्राधिकरण, आवश्यक असेल तेव्हा आणि अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी व अशा ठिकाणी बैठक घेईल.

**सल्लागार समित्या व इतर समित्या घटित करणे.**

**२८.** (१) जिल्हा प्राधिकरणास, त्याला आवश्यक वाटेल तेव्हा, त्याची कार्ये कार्यक्षमपणे पार पाडण्यासाठी एक किंवा अनेक सल्लागार समित्या व इतर समित्या घटित करता येतील.

(२) जिल्हा प्राधिकरण, आपल्या सदस्यांमधून, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या समितीचा अध्यक्ष नियुक्त करील.

(३) पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या कोणत्याही समितीमध्ये किंवा उप-समितीमध्ये तज्ज्ञ म्हणून सहयोगी केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील असे भत्ते प्रदान करण्यात येतील.

**जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करणे.**

**२९.** राज्य शासन, जिल्हा प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे अधिकारी, सल्लागार व इतर कर्मचारी जिल्हा प्राधिकरणाला पुरवील.

**जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.**

**३०.** (१) जिल्हा प्राधिकरण, आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हा नियोजन, समन्वयन व अंमलबजावणी करणारी संस्था म्हणून काम करील आणि राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनांसाठी सर्व उपाययोजना करील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणेस बाध न येता, जिल्हा प्राधिकरणास,—

(एक) जिल्ह्यासाठी जिल्हा प्रतिसाद योजनेसह आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करता येईल ;

(दोन) राष्ट्रीय धोरण, राज्य धोरण, राष्ट्रीय योजना, राज्य योजना व जिल्हा योजना यांच्या अंमलबजावणीचे समन्वयन व संनियंत्रण करता येईल ;

(तीन) जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांनी तसेच स्थानिक प्राधिकरणांनी जिल्ह्यातील आपत्तीप्रवण क्षेत्रे निश्चित केली असल्याची आणि आपत्तींस प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्या परिणामांचे निवारण करण्यासाठी उपाययोजना हाती घेतलेल्या असल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(चार) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी, तिचे परिणाम सौम्य करण्यासाठी, तिच्या सुसज्जतेसाठी व तिला प्रतिसाद देण्याकरिता उपाययोजना करण्यासाठी, राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे, जिल्हा स्तरावरील सर्व शासकीय विभागांकडून आणि जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांकडून अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(पाच) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना हाती घेण्याकरिता जिल्हा स्तरावरील विविध प्राधिकरणांना व स्थानिक प्राधिकरणांना निदेश देता येतील ;

(सहा) जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांच्या व जिल्ह्यामधील स्थानिक प्राधिकरणांच्या आपत्ती प्रतिबंध व्यवस्थापन योजनेची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील ;

(सात) जिल्हा स्तरावर शासकीय विभागांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करता येईल ;

(आठ) शासकीय विभागांच्या विकास योजनांमध्ये व प्रकल्पांमध्ये आपत्तींचा प्रतिबंध करण्याच्या आणि त्यांचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यांनी जिल्हा स्तरावर अनुसरण करावयाची मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील आणि त्यासाठी आवश्यक ते तांत्रिक साहाय्य देता येईल ;

(नऊ) खंड (आठ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करता येईल ;

(दहा) जिल्ह्यातील कोणत्याही आपत्तीला किंवा धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देण्यासाठीच्या क्षमतांच्या स्थितीचा आढावा घेता येईल आणि आवश्यकता असेल त्याप्रमाणे त्यांचे क्षमतावर्धन करण्यासाठी जिल्हा स्तरावरील संबंधित विभागांना किंवा प्राधिकरणांना निदेश देता येतील ;

(अकरा) सुसज्जता उपाययोजनांचा आढावा घेता येईल आणि कोणत्याही आपत्तीस किंवा धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस प्रभावीपणे प्रतिसाद देण्याकरिता आवश्यक असलेल्या स्तरापर्यंत सुसज्जता उपाययोजना करण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा, जिल्हा स्तरावरील संबंधित विभागांना किंवा इतर संबंधित प्राधिकरणांना निदेश देता येतील ;

(बारा) जिल्ह्यातील विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी व स्वेच्छेने बचाव कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी विशेषीकृत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करता येईल व त्याचे समन्वय करता येईल ;

(तेरा) स्थानिक प्राधिकरणे, शासकीय व अशासकीय संघटना यांच्या साहाय्याने आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्यासाठी सामाजिक प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबविता येतील ;

(चौदा) जनतेला पूर्व इशारा देणारी किंवा त्यांच्यापर्यंत योग्य ती माहिती प्रसारित करणारी यंत्रणा स्थापन करता येईल, तिचे परिरक्षण करता येईल, तिचा आढावा घेता येईल व तिचा दर्जावाढ करता येईल ;

(पंधरा) जिल्हा स्तरावरील प्रतिसाद योजना व मार्गदर्शक तत्त्वे तयार करता येतील, त्यांचा आढावा घेता येईल व ती अद्ययावत करता येतील ;

(सोळा) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रतिसादाचे समन्वयन करता येईल ;

(सतरा) जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांनी आणि स्थानिक प्राधिकरणांनी, जिल्हा प्रतिसाद योजनेनुसार त्यांच्या प्रतिसाद योजना तयार केल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(अठरा) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस किंवा आपत्तीस प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता जिल्हा स्तरावरील संबंधित शासकीय विभागांसाठी किंवा जिल्ह्याच्या स्थानिक सीमांमधील इतर कोणत्याही प्राधिकरणांसाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करता येतील किंवा त्यांना निदेश देता येतील ;

(एकोणीस) आपत्ती व्यवस्थापनाचे काम करीत असलेल्या जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांच्या, वैधानिक संस्थांच्या आणि जिल्ह्यातील इतर शासकीय व अशासकीय संघटनांच्या कामकाजांबाबत सल्ला देता येईल, साहाय्य करता येईल आणि त्याचे समन्वयन करता येईल ;

(वीस) जिल्ह्यातील धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस किंवा आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या किंवा तिचे निवारण करण्याच्या उपाययोजना तत्परतेने आणि प्रभावीपणे केल्या जात आहेत, याची सुनिश्चिती करण्यासाठी जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांशी समन्वय साधता येईल आणि त्यांना मार्गदर्शक सूचना देता येतील ;

(एकवीस) जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांना त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य पुरवता येईल अथवा सल्ला देता येईल ;

(बावीस) जिल्हा स्तरावरील शासकीय विभाग, सांविधिक प्राधिकरणे, स्थानिक प्राधिकरणे यांनी तयार केलेल्या विकास योजनांचा, आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्यासाठी, त्यात आवश्यक त्या तरतुदी करण्याच्या दृष्टीने, आढावा घेता येईल ;

(तेवीस) जिल्ह्यातील कोणत्याही क्षेत्रातील बांधकामाची तपासणी करता येईल आणि आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्यासाठी अशा बांधकामांबाबत निर्धारित केलेल्या मानकांचे पालन केले जात नाही किंवा पालन करण्यात आले नाही असे, प्राधिकरणाचे मत असेल तर, अशा मानकांचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक असेल अशी कारवाई करण्याचा निदेश संबंधित प्राधिकरणाला देता येईल ;

(चोवीस) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी, ज्यांचा मदत केंद्रे किंवा छावण्या म्हणून वापर करता येईल अशा इमारती आणि जागा निश्चित करता येतील आणि अशा इमारतींमध्ये अथवा अशा ठिकाणी पाणीपुरवठ्याची व स्वच्छतेची व्यवस्था करता येईल ;

(पंचवीस) बचाव व मदत कार्याच्या साहित्याचा साठा करून ठेवता येईल किंवा असे साहित्य कमी कालावधीत उपलब्ध करून देण्याच्या सुसज्जतेची सुनिश्चिती करता येईल ;

(सव्वीस) आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित असणाऱ्या विविध पैलूंसंबंधी राज्य प्राधिकरणाला माहिती पुरविता येईल ;

(सत्तावीस) आपत्ती व्यवस्थापनाकरिता जिल्ह्यातील तळागाळात काम करणाऱ्या अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी समाजकल्याण संस्था यांच्या सहभागास प्रोत्साहन देता येईल ;

(अठ्ठावीस) संदेशवहन व्यवस्था सुस्थितीत आहे, आणि नियत कालांतराने आपत्ती व्यवस्थापन सराव करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(एकोणतीस) जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाकरिता राज्य शासन किंवा राज्य प्राधिकरण त्याला नेमून देईल किंवा त्याला आवश्यक वाटत असतील अशी इतर कार्ये पार पाडता येतील.

**जिल्हा योजना.** **३१.** (१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्याकरिता एक आपत्ती व्यवस्थापन योजना असेल.

(२) स्थानिक प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर आणि राष्ट्रीय योजना तसेच राज्य योजना विचारात घेऊन, राज्य प्राधिकरणाने मान्यता द्यावयाची जिल्हा योजना, जिल्हा प्राधिकरणाकडून तयार करण्यात येईल.

(३) जिल्हा योजनेमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :—

(क) वेगवेगळ्या स्वरूपाच्या आपत्तींची आपत्तीप्रवणता असलेली, जिल्ह्यातील क्षेत्रे ;

(ख) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तिचे निवारण करण्यासाठी जिल्हा पातळीवरील शासकीय विभागांनी आणि जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजना ;

(ग) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस किंवा आपत्तीस प्रतिसाद देण्यासाठी, जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांनी आणि जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांनी हाती घेण्याची आवश्यकता असलेल्या क्षमता निर्माणाच्या आणि सुसज्जतेच्या उपाययोजना ;

(घ) आपत्तीच्या प्रसंगी,—

(एक) जिल्हा स्तरावरील शासकीय विभागांना आणि जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकरणांना जबाबदारी वाटून देण्यासाठी ;

(दोन) आपत्तीस तत्परतेने प्रतिसाद देण्यासाठी आणि त्याच्या मदतकार्यासाठी ;

(तीन) अत्यावश्यक संसाधने मिळविण्यासाठी ;

(चार) संदेशवहन दुवे प्रस्थापित करण्यासाठी ; आणि

(पाच) जनतेकडे माहिती प्रसारित करण्यासाठी,

तरतूद करणारी प्रतिसाद योजना व कार्यपद्धती ;

(ङ) राज्य प्राधिकरणाला आवश्यक वाटतील अशा इतर कोणत्याही बाबी.

(४) जिल्हा योजनेचा दरवर्षी आढावा घेण्यात येईल आणि ती अद्ययावत करण्यात येईल.

(५) पोट-कलमे (२) व (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जिल्हा योजनेच्या प्रती, त्या जिल्ह्यातील शासकीय विभागांना उपलब्ध करून देण्यात येतील.

(६) जिल्हा प्राधिकरण, जिल्हा योजनेची एक प्रत, राज्य प्राधिकरणाकडे पाठवील आणि राज्य प्राधिकरण ती, राज्य शासनाकडे अग्रेषित करील.

(७) जिल्हा प्राधिकरण, योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेईल आणि जिच्या अंमलबजावणीसाठी त्याला आवश्यक वाटतील अशा सूचना जिल्ह्यातील शासनाच्या वेगवेगळ्या विभागांना देईल.

**जिल्हा स्तरावरील वेगवेगळ्या प्राधिकरणांच्या योजना आणि त्यांची अंमलबजावणी.**

**३२.** जिल्हा स्तरावरील भारत सरकारचे आणि राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय आणि स्थानिक प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाच्या अधीन राहून,—

(क) पुढील बाबींचा अंतर्भाव असलेली एक आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करील :—

(एक) जिल्हा योजनेत तरतूद केल्याप्रमाणे आणि संबंधित विभागास किंवा अभिकरणास नेमून दिल्याप्रमाणे, प्रतिबंधात्मक व निवारण उपाययोजनांच्या तरतुदी करणे ;

(दोन) जिल्हा योजनेत निर्धारित केल्याप्रमाणे, क्षमता निर्माणाशी व सुसज्जतेशी संबंधित असलेल्या उपाययोजना हाती घेण्याच्या तरतुदी करणे ;

(तीन) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा, आपत्तीच्या प्रसंगी, प्रतिसाद योजना आणि कार्यपद्धती.

(ख) आपली योजना तयार करताना आणि तिची अंमलबजावणी करताना, स्थानिक प्राधिकरण, समाज आणि इतर हितसंबंधित व्यक्ती यांसह जिल्हा स्तरावरील इतर संघटना यांच्याशी समन्वय साधणे ;

(ग) योजनेचा नियतकालिक आढावा घेणे आणि ती अद्ययावत करणे ; आणि

(घ) आपल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेची प्रत त्यातील कोणत्याही सुधारणेसह जिल्हा प्राधिकरणाला सादर करणे.

**जिल्हा प्राधिकरणाने फर्मावणे.**

**३३.** जिल्हा प्राधिकरणास, आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्यासाठी किंवा तिला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी आवश्यक असतील अशा, उपाययोजना हाती घेण्यासाठी जिल्हा स्तरावरील कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा विभागाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, आदेशाद्वारे, फर्मावता येईल, आणि असा अधिकारी अथवा विभाग, अशा आदेशाचे पालन करण्यास बांधील असेल.

**कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.**

**३४.** कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देताना, लोकांना साहाय्य करण्याच्या, त्यांना संरक्षण देण्याच्या, किंवा मदत करण्याच्या प्रयोजनार्थ, जिल्हा प्राधिकरणास,—

(क) जिल्ह्यातील शासनाच्या कोणत्याही विभागाकडे आणि स्थानिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली संसाधने देण्यासाठी आणि त्यांचा वापर करण्यासाठी निदेश देता येतील ;

(ख) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्राकडे आणि त्या क्षेत्राकडून व त्या क्षेत्रांतर्गत होणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवता येईल आणि त्यावर निर्बंध घालता येतील ;

(ग) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या प्रवेशावर, तेथील हालचालीवर व तेथून निघून जाण्यावर नियंत्रण ठेवता येईल व निर्बंध घालता येतील ;

(घ) ढिगारे उपसता येतील, शोध कार्य करता येईल व बचाव कार्ये पार पाडता येतील ;

(ङ) निवारा, अन्न, पिण्याचे पाणी आणि आवश्यक अन्नसामग्री, आरोग्यविषयक देखभाल व सेवा पुरविता येतील ;

(च) बाधित क्षेत्रामध्ये आपत्कालीन संदेशवहन यंत्रणा स्थापन करता येतील ;

(छ) बेवारस प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या व्यवस्था करता येतील ;

(ज) त्याच्या मते आवश्यक असतील अशा उपाययोजना करण्यासाठी जिल्हा स्तरावरील राज्य शासनाच्या अधिपत्याखालील राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा कोणत्याही प्राधिकरणाला किंवा संस्थेला शिफारस करता येईल ;

(झ) त्यास आवश्यक वाटेल असा सल्ला आणि साहाय्य देण्यासाठी संबंधित क्षेत्रांमधील तज्ज्ञ व सल्लागार यांना, फर्माविता येईल ;

(ञ) कोणत्याही प्राधिकरणाकडील किंवा व्यक्तीकडील सोयीसुविधांचा अनन्य किंवा अधिमान्य वापर करता येईल ;

(ट) तात्पुरत्या पुलांचे किंवा इतर आवश्यक संरचनांचे बांधकाम करता येईल आणि जनतेला धोकादायक असतील किंवा आपत्तीचे परिणाम गंभीर करील अशा संरचना पाडून टाकता येतील ;

(ठ) अशासकीय संघटना, समन्याय व भेदभावरहित रीतीने त्यांचे कामकाज पार पाडीत असल्याची सुनिश्चिती करता येईल ;

(ड) अशा परिस्थितीमध्ये करणे आवश्यक असतील किंवा भाग पडतील अशा इतर उपाययोजना करता येतील.

प्रकरण पाच

## सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन उपाययोजना

**केंद्र सरकारने उपाययोजना करणे.**

**३५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, केंद्र सरकार, आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व उपाययोजना करील.

(२) विशेषतः आणि पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, त्या पोट-कलमान्वये केंद्र सरकार ज्या हाती घेऊ शकेल त्या उपाययोजनांमध्ये, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधातील उपाययोजनांचा समावेश असेल :—

(क) आपत्ती व्यवस्थापनाच्या संबंधात भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग, राज्य शासने, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरणे, शासकीय व अशासकीय संघटना यांच्या कार्यांचे समन्वयन करणे ;

(ख) भारत सरकारच्या मंत्रालयांनी किंवा विभागांनी त्यांच्या विकास योजनांमध्ये व प्रकल्पांमध्ये आपत्तींना प्रतिबंध करण्याच्या व त्यांचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण केल्याची सुनिश्चिती करणे ;

(ग) भारत सरकारच्या मंत्रालयांकडून किंवा विभागांकडून आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी, तिचे निवारण करण्यासाठी, क्षमतानिर्माण करण्यासाठी व सुसज्जतेसाठी निधींच्या यथोचित वाटपाची सुनिश्चिती करणे ;

(घ) भारत सरकारच्या मंत्रालयांकडून किंवा विभागांकडून कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस किंवा आपत्तीस तत्परतेने व प्रभावीपणे प्रतिसाद देण्यास सुसज्ज राहण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ङ) राज्य शासनांच्या विनंतीवरून किंवा अन्यथा त्यास उचित वाटेल त्यानुसार त्यांना सहकार्य व साहाय्य करणे ;

(च) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, आवश्यक असेल त्याप्रमाणे नौसेना, सेना व वायुसेना, संघराज्याची अन्य सशस्त्र दले किंवा अन्य कोणतेही नागरी कर्मचारी तैनात करणे ;

(छ) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, संयुक्त राष्ट्रांची अभिकरणे, आंतरराष्ट्रीय संघटना व विदेशी सरकारे यांच्याशी समन्वय साधणे ;

(ज) आपत्ती व्यवस्थापनाच्या क्षेत्रामधील संशोधन, प्रशिक्षण व विकास कार्यक्रमांसाठी संस्था स्थापन करणे ;

(झ) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा इतर बाबी.

(३) केंद्र सरकार, मोठ्या आपत्तींमुळे बाधित झालेल्या इतर देशांना, त्यास योग्य वाटेल असे साहाय्य देऊ शकेल.

**भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग यांच्या जबाबदाऱ्या.**

**३६.** भारत सरकारच्या प्रत्येक मंत्रालयाची व विभागाची पुढील जबाबदारी असेल :—

(क) राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपत्तींचा प्रतिबंध, निवारण, सुसज्जता व क्षमतावर्धन यांसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपत्तींचा प्रतिबंध किंवा निवारण करण्याच्या उपाययोजनांचे त्यांच्या विकास योजनांमध्ये व प्रकल्पांमध्ये एकात्मीकरण करणे ;

(ग) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार किंवा याबाबतीतील राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या निदेशांनुसार कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रभावीपणे व तत्परतेने प्रतिसाद देणे ;

(घ) आपत्तींचा प्रतिबंध, निवारण किंवा सुसज्जता यांसाठी आवश्यक असलेल्या तरतुदींचा, त्यांच्याकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या अधिनियमितींमध्ये, त्यांच्या धोरणांमध्ये व नियमांमध्ये आणि विनियमांमध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने, त्यांचा आढावा घेणे ;

(ङ) आपत्तीचा प्रतिबंध, निवारण, क्षमतावर्धन व सुसज्जता करण्याच्या उपाययोजनांसाठी निधींचे वाटप करणे ;

(च) राष्ट्रीय प्राधिकरणास व राज्य शासनांना पुढील बाबतीत साहाय्य करणे :—

(एक) आपत्ती व्यवस्थापनाच्या संबंधातील निवारण, सुसज्जता व प्रतिसाद योजना तयार करणे, क्षमतावर्धन करणे, आधारसामग्री गोळा करणे व ती निश्चित करणे आणि कर्मचारीवर्गाला प्रशिक्षण देणे ;

(दोन) बाधित क्षेत्रामध्ये बचाव व मदत कार्ये पार पाडणे ;

(तीन) कोणत्याही आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे मूल्य निर्धारण करणे ;

(चार) पुनर्वसन व पुनर्रचना करण्याचे काम पार पाडणे ;

(छ) पुढील बाबींकरिता उपाययोजना करण्यासह कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला तत्परतेने आणि प्रभावीपणे प्रतिसाद देण्याच्या प्रयोजनांसाठी राष्ट्रीय कार्यकारी समितीला किंवा राज्य कार्यकारी समितीला त्यांची संसाधने उपलब्ध करून देणे, त्या बाबी अशा :—

(एक) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्रामध्ये आपत्कालीन दळणवळण यंत्रणा उभारणे ;

(दोन) बाधित क्षेत्रामध्ये व बाधित क्षेत्रामधून कर्मचारीवर्गाची आणि मदत साहित्यांची वाहतूक करणे ;

(तीन) निर्वासन करणे, बचाव करणे, तात्पुरता निवारा उभारणे किंवा इतर तातडीचे मदतकार्य पुरविणे ;

(चार) तात्पुरते पूल, लहान धक्के आणि उतरवण्याच्या जागांची उभारणी करणे ;

(पाच) बाधित क्षेत्रामध्ये पिण्याचे पाणी, अत्यावश्यक अन्नसामग्री, आरोग्यविषयक देखभाल, व सेवा पुरविणे ;

(ज) आपत्ती व्यवस्थापनाकरिता त्यास आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करणे.

**भारत सरकारच्या मंत्रालयांच्या किंवा विभागांच्या आपत्ती व्यवस्थापन योजना.**

**३७.** (१) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग,—

(क) पुढील तपशील विनिर्दिष्ट करणारी आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करील :—

(एक) राष्ट्रीय योजनेनुसार आपत्तींस प्रतिबंध करण्यासाठी व तिचे निवारण करण्यासाठी त्यांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजना ;

(दोन) राष्ट्रीय प्राधिकरणाच्या व राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, त्यांच्या विकास योजनांमध्ये निवारण उपाययोजनांचे एकात्मीकरण करण्याशी संबंधित असणारे विनिर्देश ;

(तीन) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रतिसाद देण्याकरिता सुसज्जता व क्षमतानिर्माण करण्याच्या संबंधातील त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या ;

(चार) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला तत्परतेने व कार्यक्षमतेने प्रतिसाद देण्यासंबंधातील त्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या ;

(पाच) उप-खंड (तीन) व (चार) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांच्या सुसज्जतेची विद्यमान स्थिती ;

(सहा) उप-खंड (तीन) व (चार) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडणे शक्य व्हावे यादृष्टीने हाती घेण्याची आवश्यकता असलेल्या उपाययोजना ;

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या योजनेचा दर वर्षी आढावा घेईल आणि ती अद्ययावत करील ;

(ग) खंड (क) किंवा, यथास्थिति, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या योजनेची एक प्रत, केंद्र सरकारला सादर करील आणि केंद्र सरकार, त्याची एक प्रत, राष्ट्रीय प्राधिकरणाला, त्याच्या मान्यतेसाठी अग्रेषित करील.

(२) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग,—

(क) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये, आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करताना, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यांना वित्तपुरवठा करण्याची तरतूद करील ;

(ख) पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्याशी संबंधित असणारा स्थितीदर्शक अहवाल, त्याच्याकडून मागणी करण्यात येईल त्या त्या वेळी राष्ट्रीय प्राधिकरणाला सादर करील.

**राज्य शासनाने उपाययोजना करणे.**

**३८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक राज्य शासन, आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी, राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व उपाययोजना करील आणि त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा आणखी उपाययोजना करील.

(२) राज्य शासनास, पोट-कलम (१) अन्वये हाती घेता येतील अशा उपाययोजनांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधातील उपाययोजनांचा समावेश असेल :—

(क) राज्य शासनाचे वेगवेगळे विभाग, राज्य प्राधिकरण, जिल्हा प्राधिकरणे, स्थानिक प्राधिकरण आणि इतर अशासकीय संघटना यांच्या कार्यांचे समन्वयन करणे ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरण व राष्ट्रीय कार्यकारी समिती, राज्य प्राधिकरण व राज्य कार्यकारी समिती, आणि जिल्हा प्राधिकरणे यांना आपत्ती व्यवस्थापनामध्ये सहकार्य व साहाय्य करणे ;

(ग) भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग यांना, त्यांच्या विनंतीवरून किंवा अन्यथा त्यास उचित वाटेल त्याप्रमाणे आपत्ती व्यवस्थापनामध्ये सहकार्य व साहाय्य करणे ;

(घ) राज्य योजना व जिल्हा योजना यांच्या तरतुदींना अनुसरून, राज्य शासनाच्या विभागांनी आपत्तीस प्रतिबंध करणे, तिचे निवारण करणे, क्षमतावर्धन व सुसज्जता यांकरिता उपाययोजना करण्यासाठी निधींचे वाटप करणे ;

(ङ) राज्य शासनाच्या विभागांच्या विकास योजना व प्रकल्प यांमध्ये, त्या विभागांनी आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी किंवा तिचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे एकात्मीकरण केले असल्याची सुनिश्चिती करणे ;

(च) राज्याच्या वेगवेगळ्या भागांमधील वेगवेगळ्या आपत्तींची आपत्तीप्रवणता कमी करण्याच्या किंवा तिचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे राज्य विकास योजनेमध्ये एकात्मीकरण करणे ;

(छ) राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्याच्या वेगवेगळ्या विभागांकडून आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ज) आपत्तीप्रवण समाजाच्या स्तरापर्यंत पोहचतील अशा पर्याप्त इशारा देणाऱ्या यंत्रणा स्थापन करणे ;

(झ) राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागांनी व जिल्हा प्राधिकरणांनी सुसज्जतेच्या समुचित उपाययोजना हाती घेतल्या असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ञ) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीत किंवा आपत्तीमध्ये, तिला प्रभावीपणे प्रतिसाद देण्याच्या, बचाव व मदत कार्य हाती घेण्याच्या प्रयोजनांसाठी, राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा, यथास्थिति, जिल्हा प्राधिकरणे यांना अशा कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीमध्ये किंवा आपत्तीमध्ये, राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागांकडील संसाधने उपलब्ध करून दिली जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(ट) कोणत्याही आपत्तीस बळी पडलेल्या व्यक्तींना पुनर्वसन व पुनर्रचना साहाय्य करणे ; आणि

(ठ) या अधिनियमाच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा अन्य बाबी.

**राज्य शासनाच्या विभागांच्या जबाबदाऱ्या.**

**३९.** राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाची जबाबदारी पुढीलप्रमाणे असेल :—

(क) राष्ट्रीय प्राधिकरणाने व राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी, तिचे निवारण करण्यासाठी, सुसज्जता व क्षमतावर्धन करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे ;

(ख) आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या व तिचे निवारण करण्याच्या उपाययोजनांचे त्यांच्या विकास योजना व प्रकल्प यांमध्ये एकात्मीकरण करणे ;

(ग) आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी, तिचे निवारण करण्यासाठी, क्षमतावर्धन व सुसज्जता करण्यासाठी निधींचे वाटप करणे ;

(घ) राज्य योजनेनुसार, आणि राष्ट्रीय कार्यकारी समितीची व राज्य कार्यकारी समितीची मार्गदर्शक तत्त्वे किंवा निदेश यांनुसार, कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीला किंवा आपत्तीला प्रभावीपणे व तत्परतेने प्रतिसाद देणे ;

(ङ) आपत्तीस प्रतिबंध करणे, तिचे निवारण किंवा सुसज्जता यांसाठी आवश्यक असलेल्या तरतुदींचा त्यांमध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या अधिनियमिती, त्यांची धोरणे व नियम आणि विनियम यांचा आढावा घेणे ;

(च) राष्ट्रीय कार्यकारी समितीने, राज्य कार्यकारी समितीने व जिल्हा प्राधिकरणाने फर्माविल्याप्रमाणे पुढील बाबतीत साहाय्य करणे :—

(एक) आपत्ती व्यवस्थापनाच्या संबंधातील निवारण, सुसज्जता व प्रतिसाद योजना तयार करणे, क्षमतावर्धन करणे, आधारसामग्री करणे व ती निश्चित करणे आणि कर्मचारीवर्गाला प्रशिक्षण देणे ;

(दोन) कोणत्याही आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे निर्धारण करणे ;

(तीन) पुनर्वसन व पुनर्रचना करण्याचे काम पार पाडणे ;

(छ) जिल्हा स्तरावरील त्यांच्या प्राधिकरणांकडून जिल्हा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, संसाधनांची तरतूद करणे ;

(ज) पुढील बाबींकरिता उपाययोजना करण्यासह राज्यातील कोणत्याही आपत्तीला तत्परतेने व प्रभावीपणे प्रतिसाद देण्याच्या प्रयोजनांसाठी, राष्ट्रीय कार्यकारी समितीला किंवा राज्य कार्यकारी समितीला किंवा जिल्हा प्राधिकरणांना त्यांची साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे :—

(एक) आपत्तीप्रवण किंवा बाधित क्षेत्रासाठी आपत्कालीन दळणवळण यंत्रणा उभारणे ;

(दोन) बाधित क्षेत्राकडे किंवा बाधित क्षेत्रातून कर्मचारीवर्गाची व मदत साहित्याची वाहतूक करणे ;

(तीन) निर्वासन करणे, बचाव करणे, तात्पुरता निवारा उभारणे किंवा इतर तातडीची मदत पुरविणे ;

(चार) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या क्षेत्रातून व्यक्तींचे किंवा जनावरांचे निर्वासन करणे ;

(पाच) तात्पुरते पूल, लहान धक्के व उतरविण्याच्या जागा उभारणे ;

(सहा) बाधित क्षेत्रामध्ये पिण्याचे पाणी, अत्यावश्यक अन्नसामग्री, आरोग्यविषयक देखभाल व सेवा पुरविणे ;

(झ) आपत्ती व्यवस्थापनाकरिता आवश्यक असतील अशी इतर कामे करणे.

**राज्याच्या विभागांची आपत्ती व्यवस्थापन योजना.**

**४०.** (१) राज्य शासनाचा प्रत्येक विभाग, राज्य प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुरूप,—

(क) एक आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करील, त्यात पुढील बाबी निर्धारित करील :—

(एक) ज्यासाठी राज्यातील वेगवेगळे भाग आपत्तीप्रवण आहेत त्या आपत्तींचे प्रकार ;

(दोन) आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या किंवा तिच्या परिणामांचे निवारण करण्याच्या किंवा या दोन्हींच्या कार्यतंत्रांचे विभागाच्या विकास योजनांमध्ये व कार्यक्रमांमध्ये एकात्मीकरण करणे ;

(तीन) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी राज्याच्या विभागाच्या भूमिका व जबाबदाऱ्या आणि त्यांनी पार पाडणे आवश्यक असलेले आपत्कालीन साहाय्यभूत कार्य ;

(चार) उप-खंड (तीन) अन्वये अशी भूमिका किंवा जबाबदाऱ्या किंवा आपत्कालीन साहाय्यभूत कार्य पार पाडण्याच्या आपल्या सुसज्जतेबाबतची विद्यमान स्थिती ;

(पाच) भारत सरकारची मंत्रालये किंवा विभाग यांना, कलम ३७ खालील आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे शक्य व्हावे या दृष्टीने, अंमलात आणावयाच्या प्रस्तावित केलेल्या क्षमतानिर्माण व सुसज्जतेविषयक उपाययोजना ;

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या योजनेचा दरवर्षी आढावा घेणे व ती अद्ययावत करणे ; आणि

(ग) खंड (क) किंवा, यथास्थिति, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या योजनेची प्रत, राज्य प्राधिकरणाला सादर करणे.

(२) राज्य शासनाचा प्रत्येक विभाग, पोट-कलम (१) अन्वये योजना तयार करताना, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या उपक्रमांना वित्त पुरवठा करण्याच्या तरतुदी करील.

(३) राज्य शासनाचा प्रत्येक विभाग, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या आपत्ती व्यवस्थापन योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधात, राज्य कार्यकारी समितीला अंमलबजावणीविषयक स्थितीचा अहवाल सादर करील.

प्रकरण सहा

## स्थानिक प्राधिकरणे

**स्थानिक प्राधिकरणाची कार्ये.**

**४१.** (१) जिल्हा प्राधिकरणाच्या निदेशांच्या अधीन राहून, स्थानिक प्राधिकरण,—

(क) त्याचे अधिकारी व कर्मचारी आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित असल्याची खात्री करील ;

(ख) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी वापरासाठी सहजपणे उपलब्ध होतील अशा रीतीने आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित असणारी संसाधने सुस्थितीत ठेवली असल्याची खात्री करील ;

(ग) त्याच्या अधिपत्याखालील किंवा त्याच्या अधिकारक्षेत्रातील सर्व बांधकाम प्रकल्प, राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य प्राधिकरणाने आणि जिल्हा प्राधिकरणाने आपत्तीस प्रतिबंध करण्यासाठी आणि तिचे निवारण करण्यासाठी निर्धारित केलेल्या मानकांनुसार व विनिर्देशांनुसार, असल्याची खात्री करील ;

(घ) राज्य योजना व जिल्हा योजना यांनुसार बाधित क्षेत्रामध्ये मदत, पुनर्वसन व पुनर्रचना कार्ये पार पाडील.

(२) स्थानिक प्राधिकरणास, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना करता येतील.

प्रकरण सात

## राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था

**राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था.**

**४२.** (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीतील नियत करील अशा दिनांकापासून राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था म्हणून संबोधण्यात यावयाची एक संस्था घटित करण्यात येईल.

(२) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील इतक्या संख्येतील सदस्यांचा समावेश असेल.

(३) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांचा पदावधी व त्या सदस्यांमधील रिक्त जागा आणि अशा रिक्त जागा भरण्याची रीत, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे एक नियामक मंडळ असेल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांमधून केंद्र सरकारद्वारे ते घटित करण्यात येईल.

(५) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे नियामक मंडळ, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कार्ये पार पाडील.

(६) नियामक मंडळाने, त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कार्ये पार पाडताना अनुसरावयाची कार्यपद्धती, आणि नियामक मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्या सदस्यांमधील रिक्त जागा भरण्याची रीत विनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(७) या कलमान्वये विनियम करण्यात येईपर्यंत, केंद्र सरकारला असे विनियम तयार करता येतील ; आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेस, तिच्या अधिकारांचा वापर करताना, अशा प्रकारे केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये फेरफार करता येईल किंवा ते विखंडित करता येतील.

(८) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, राष्ट्रीय प्राधिकरणाने निर्धारित केलेली व्यापक धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे यांनुसार कार्य करील, आणि आपत्ती व्यवस्थापन धोरणे, प्रतिबंधक यंत्रणा आणि निवारण उपाययोजना यांच्याशी संबंधित असणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन, दस्तऐवजीकरण व राष्ट्रीय स्तरावरील माहिती आधारित विकास या क्षेत्रातील प्रशिक्षण व संशोधन यांचे नियोजन व प्रचालन करण्यासाठी जबाबदार असेल.

(९) पोट-कलम (८) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, राष्ट्रीय संस्थेस, तिची कार्ये पार पाडण्यासाठी,—

(क) प्रशिक्षण पाठ्यक्रम विकसित करता येतील, आपत्ती व्यवस्थापनामधील संशोधन व दस्तऐवजीकरण हाती घेता येईल आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करता येतील ;

(ख) आपत्ती व्यवस्थापनाच्या सर्व पैलूंचा समावेश असणारी एक सर्वसमावेशक मानवी संसाधन विकास योजना तयार करता येईल आणि तिची अंमलबजावणी करता येईल ;

(ग) राष्ट्रीय स्तरावरील धोरण तयार करण्यात साहाय्य करता येईल ;

(घ) शासकीय कर्मचाऱ्यांसह हितसंबंधित व्यक्तींकरिता प्रशिक्षण व संशोधन कार्यक्रम विकसित करण्यासाठी प्रशिक्षण व संशोधन संस्थांना आवश्यक असलेले साहाय्य करता येईल आणि राज्य स्तरीय प्रशिक्षण संस्थांच्या अध्यापकांचे प्रशिक्षण हाती घेता येईल ;

(ङ) राज्य स्तरीय धोरणे, कार्यतंत्रे, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यामध्ये, राज्य शासनांना आणि राज्य प्रशिक्षण संस्थांना साहाय्य करता येईल आणि हितसंबंधित व्यक्ती, शासन तसेच त्याचे कर्मचारी, नागरी समाजातील सदस्य, उद्योग क्षेत्र व जनतेचे निवडलेले लोक प्रतिनिधी यांचे क्षमतानिर्माण करण्यासाठी राज्य शासनांना किंवा राज्य प्रशिक्षण संस्थांना आवश्यक असे इतर कोणतेही साहाय्य करता येईल ;

(च) शैक्षणिक व व्यावसायिक पाठ्यक्रमांसह आपत्ती व्यवस्थापनासाठी शैक्षणिक साहित्य विकसित करता येईल ;

(छ) अनेकविध धोक्यांचे निवारण, सुसज्जता व प्रतिसाद उपाययोजनांशी सहयोगी असलेले महाविद्यालयीन किंवा शाळांमधील शिक्षक व विद्यार्थी, तांत्रिक कर्मचारीवर्ग व इतर यांसह हितसंबंधित व्यक्ती यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करण्यास चालना देता येईल ;

(ज) उपरोक्त उद्दिष्टांचे प्रचालन करण्यासाठी देशामध्ये व देशाबाहेर अभ्यास पाठ्यक्रम, परिषदा, व्याख्याने, चर्चासत्रे हाती घेता येतील, आयोजित करता येतील व त्यांच्या सुविधा पुरविता येतील ;

(झ) उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्यासाठी नियतकालिके, शोध निबंध व पुस्तके यांचे प्रकाशन करण्याचे काम हाती घेता येईल आणि त्यासाठी तरतूद करता येईल आणि ग्रंथालये स्थापन करता येतील आणि ती चालविता येतील ;

(ञ) वरील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी हितावह किंवा आनुषंगिक असतील अशा इतर सर्व कायदेशीर गोष्टी करता येतील ; आणि

(ट) केंद्र सरकारद्वारे तिला नेमून देण्यात येईल असे इतर कोणतेही कार्य हाती घेता येईल.

**राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे अधिकारी व इतर कर्मचारी.**

**४३.** केंद्र सरकार, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेला, आपली कार्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे अधिकारी, सल्लागार व इतर कर्मचारीवर्ग पुरवील.

प्रकरण आठ

## राष्ट्रीय आपत्ती कृतिप्रवण दल

**राष्ट्रीय आपत्ती कृतिप्रवण दल.**

**४४.** (१) धोकादायक आपत्कालीन परिस्थितीस अथवा आपत्तीस विशेष प्रतिसाद देण्याच्या प्रयोजनासाठी, एक राष्ट्रीय आपत्ती कृतिप्रवण दल स्थापन करण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, विहित करण्यात येईल अशा रीतीने दल घटित करण्यात येईल आणि, दलाच्या सदस्यांच्या शिस्तभंगविषयक तरतुदींसह त्यांच्या सेवाशर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**नियंत्रण, निदेशन, इत्यादी.**

**४५.** दलाचे सर्वसाधारण अधीक्षण, निदेशन व नियंत्रण, राष्ट्रीय प्राधिकरणाकडे निहित असेल व त्याच्याद्वारे त्याचा वापर करण्यात येईल आणि दलाचे अधिपत्य व पर्यवेक्षण हे, राष्ट्रीय आपत्ती कृतिप्रवण दलाचा महासंचालक म्हणून केंद्र सरकारने नियुक्त करावयाच्या अधिकाऱ्याकडे निहित असेल.

प्रकरण नऊ

## वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

**राष्ट्रीय आपत्ती कृतिप्रवण निधी.**

**४६.** (१) कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीचे किंवा आपत्तीचे निवारण करण्यासाठी, केंद्र सरकारला, राष्ट्रीय आपत्ती कृतीप्रवण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा एक निधी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे स्थापन करता येईल आणि या निधीत पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(क) याबाबतीत कायद्याद्वारे संसदेने केलेल्या यथोचित विनियोजनानंतर, केंद्र सरकार तरतूद करील तेवढी रक्कम ;

(ख) आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून देण्यात येतील अशी कोणतीही अनुदाने.

(२) राष्ट्रीय प्राधिकरणाशी विचारविनिमय करून, केंद्र सरकारने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आकस्मिक प्रतिसाद, मदत व पुनर्वसन करण्यावरील खर्च भागविण्याकरिता उपयोजन करण्याकरिता आपत्ती कृतीप्रवण निधी राष्ट्रीय कार्यकारी समितीला उपलब्ध करून देण्यात येईल.

**राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी.**

**४७.** (१) केंद्र सरकारला, केवळ आपत्ती निवारणाच्या प्रयोजनार्थ असलेल्या प्रकल्पांकरिता राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा एक निधी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, स्थापन करता येईल आणि याबाबतीत कायद्याद्वारे संसदेने केलेल्या यथोचित विनियोजनानंतर, केंद्र सरकार तरतूद करील तेवढी रक्कम या निधीत जमा करण्यात येईल.

(२) राष्ट्रीय प्राधिकरणाकडून राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीचे उपयोजन करण्यात येईल.

**राज्य शासनाने निधी स्थापन करणे.**

**४८.** (१) राज्य शासन, राज्य प्राधिकरण व जिल्हा प्राधिकरणे घटित करण्याकरिता काढलेल्या अधिसूचनांनंतर तात्काळ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पुढील निधी स्थापन करील :—

(क) राज्य आपत्ती कृतिप्रवण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा निधी ;

(ख) जिल्हा आपत्ती कृतिप्रवण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा निधी ;

(ग) राज्य आपत्ती निवारण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा निधी ;

(घ) जिल्हा आपत्ती निवारण निधी म्हणून संबोधण्यात यावयाचा निधी ;

(२) राज्य शासन,—

(एक) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये स्थापन केलेला निधी, राज्य कार्यकारी समितीला उपलब्ध करून दिला जात असल्याची ;

(दोन) पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये स्थापन केलेला निधी, राज्य प्राधिकरणाला उपलब्ध करून दिला जात असल्याची ;

(तीन) पोट-कलम (१) च्या खंड (ख) व (घ) अन्वये स्थापन केलेला निधी, जिल्हा प्राधिकरणाला उपलब्ध करून दिला जात असल्याची,

खात्री करील.

**मंत्रालयांकडून व विभागांकडून निधींचे वाटप.**

**४९.** (१) भारत सरकारचे प्रत्येक मंत्रालय किंवा विभाग, त्यांच्या आपत्ती व्यवस्थापन योजनेमध्ये निर्दिष्ट केलेले उपक्रम व कार्यक्रम पार पाडण्याच्या प्रयोजनांकरिता आपल्या वार्षिक अर्थसंकल्पात निधीसाठी तरतूद करील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी ह्या, योग्य त्या फेरफारांसह, राज्य शासनाच्या विभागांना लागू होतील.

**आकस्मिक प्रापण व लेखांकन.**

**५०.** जेव्हा कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीच्या किंवा आपत्तीच्या कारणाने, बचाव किंवा मदत कार्यासाठी अन्नसामग्रीचे किंवा साहित्याचे तातडीने प्रापण करणे किंवा संसाधनांचे तातडीने उपयोजन करणे आवश्यक असल्याबाबत राष्ट्रीय प्राधिकरणाची किंवा राज्य प्राधिकरणाची किंवा जिल्हा प्राधिकरणाची खात्री पटली असेल त्याबाबतीत,—

(क) त्यास, आकस्मिक प्रापण करण्याकरिता संबंधित विभागाला किंवा प्राधिकरणाला प्राधिकृत करता येईल, आणि अशा प्रकरणी, निविदा मागविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीचा अधित्याग करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, जिल्हा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या नियंत्रक अधिकाऱ्याने अन्नसामग्रींचा किंवा साहित्यांचा वापर केल्याबद्दलचे प्रमाणपत्र हे, अशा अन्नसामग्रींच्या किंवा साहित्यांच्या आकस्मिक प्रापणाबाबतच्या लेखांकनाच्या प्रयोजनासाठी वैध दस्तऐवज किंवा प्रमाणक असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दहा

## अपराध व शास्ती

**अडथळा, इत्यादीबद्दल शिक्षा.**

**५१.** जो कोणी, वाजवी कारणाशिवाय,—

(क) केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला, अथवा राष्ट्रीय प्राधिकरणाने किंवा राज्य प्राधिकरणाने किंवा जिल्हा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीला या अधिनियमाखालील त्याची कार्ये पार पाडण्यात अडथळा आणील ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये केंद्र सरकारने, किंवा राज्य शासनाने किंवा राष्ट्रीय कार्यकारी समितीने किंवा राज्य कार्यकारी समितीने किंवा जिल्हा कार्यकारी समितीने किंवा त्यांच्यावतीने दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास नकार देईल,

तो, दोषसिद्ध झाल्यावर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल, आणि जर असा अडथळा आणल्याच्या अथवा निदेशांचे अनुपालन करण्यास नकार दिल्याच्या परिणामी जिवितहानी झाली असेल किंवा त्यामुळे जीवितास निकटवर्ती धोका निर्माण झाला असेल तर, दोषसिद्ध झाल्यावर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

**खोट्या दाव्याबद्दल शिक्षा.**

**५२.** जो कोणी, केंद्र सरकारच्या, राज्य शासनाच्या, राष्ट्रीय प्राधिकरणाच्या, राज्य प्राधिकरणाच्या किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून आपत्तीच्या परिणामी कोणतीही मदत, साहाय्य, दुरूस्ती, पुनर्रचना अथवा अन्य लाभ मिळविण्यासाठी, जो खोटा असल्याचे त्यास माहीत असेल किंवा तसा विश्वास ठेवण्यास कारण असेल असा कोणताही दावा हेतूपुरस्सर करील तो, दोषसिद्ध झाल्यावर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

**पैसा किंवा साहित्य, इत्यादींचा दुर्विनियोग केल्याबद्दल शिक्षा.**

**५३.** जो कोणी, कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीत अथवा आपत्तीच्या काळात मदत करण्याच्या प्रयोजनार्थ असलेला कोणताही पैसा किंवा साहित्य सोपविण्यात आलेले असताना किंवा अन्यथा ज्याच्या अभिरक्षेत असेल किंवा ज्याच्या अधिपत्त्याखाली असताना अशा पैशाचा किंवा साहित्याचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा दुर्विनियोग करील किंवा स्वतःच्या वापरासाठी विनियोग करील किंवा विल्हेवाट लावील अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीस तसे करण्यास बुद्धिपुरस्सरपणे भाग पाडील, तो दोषसिद्ध झाल्यावर, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

**खोटा इशारा दिल्याबद्दल शिक्षा.**

**५४.** जो कोणी, आपत्तीबाबत अथवा घबराट निर्माण करणाऱ्या तिच्या तीव्रतेबाबत किंवा व्याप्तीबाबत खोटी संकट सूचना किंवा इशारा देईल किंवा प्रसारित करील तो, दोषसिद्ध झाल्यावर, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास पात्र असेल.

**शासकीय विभागांनी केलेले अपराध.**

**५५.** (१) या अधिनियमाखालील अपराध शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेला असेल त्याबाबतीत, असा अपराध, त्याच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून त्याने सर्व प्रकारची दक्षता घेतली होती असे त्याने सिद्ध केले नाही तर, त्या अपराधासाठी विभाग प्रमुख दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तो, त्यानुसार त्याच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि शिक्षा ठोठावली जाण्यास पात्र असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध, शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेला असेल आणि असा अपराध, विभाग प्रमुखाखेरीज, अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे, किंवा त्याच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असल्याचे सिद्ध करण्यात आले असेल त्याबाबतीत, असा अधिकारी, त्या अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तो, त्याच्याविरुद्ध खटला भरला जाण्यास आणि शिक्षा ठोठावली जाण्यास पात्र असेल.

**अधिकाऱ्याची कर्तव्यातील कसुरी किंवा या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनाकडे त्याने केलेला कानाडोळा.**

**५६.** ज्या अधिकाऱ्यावर या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये कोणतेही कर्तव्य सोपविण्यात आले असेल आणि जो त्याची पदीय कर्तव्ये पार पाडणे बंद करील किंवा पार पाडण्यास नकार देईल किंवा ते करण्यापासून स्वतःला दूर ठेवील असा कोणताही अधिकारी, जर त्याने त्याच्या कार्यालयीन वरिष्ठांकडून स्पष्ट लेखी परवानगी घेतली नसेल किंवा तसे करण्यासाठी त्याला इतर कायदेशीर कारण नसेल तर तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास पात्र असेल.

**अधिग्रहणाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.**

**५७.** जर कोणतीही व्यक्ती, कलम ६५ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर, ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

**कंपन्यांनी केलेला अपराध.**

**५८.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने किंवा निगम निकायाने केला असेल त्याबाबतीत, अपराध घडला त्यावेळी, त्या कंपनीचे कामकाज चालविण्याकरिता जी व्यक्ती, कंपनीची प्रभारी होती

किंवा कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे ती कंपनी, अशा उल्लंघनासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार ती, तिच्याविरूद्ध खटला भरला जाण्यास आणि शिक्षा केली जाण्यास पात्र असेल :

परंतु, जर त्या व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व प्रकारची दक्षता घेतली होती हे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमामध्ये तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध, एखाद्या कंपनीने केलेला असेल, आणि तो अपराध त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने, किंवा त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्यांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी, त्या अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, ते, त्यांच्याविरूद्ध खटला भरला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र असतील.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) " कंपनी " याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यामध्ये, एखाद्या भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या अन्य संघाचा समावेश होतो ; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, " संचालक " याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील एखादा भागीदार, असा आहे.

**५९.** केंद्र सरकारची किंवा, राज्य शासनाची, किंवा यथास्थिति, याबाबतीत अशा शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज, कलमे ५५ व ५६ खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांबद्दल कोणताही खटला भरण्यात येणार नाही. **खटला भरण्यासाठी पूर्व मंजुरी घेणे.**

**६०.** (क) राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य प्राधिकरणाने, केंद्र सरकारने, राज्य शासनाने, जिल्हा प्राधिकरणाने किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने किंवा याबाबतीत त्या प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने ; किंवा **अपराधांची दखल घेणे.**

(ख) जिने अभिकथित अपराधाबाबत विहित केलेल्या रीतीने, तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस दिली असेल आणि राष्ट्रीय प्राधिकरणाकडे, राज्य प्राधिकरणाकडे, केंद्र सरकारकडे, राज्य शासनाकडे, जिल्हा प्राधिकरणाकडे किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा उपरोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे तक्रार करण्याचा तिचा इरादा असेल अशा कोणत्याही व्यक्तीने,

केलेल्या तक्रारीखेरीज कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील अपराधाची दखल घेणार नाही.

प्रकरण अकरा

## संकीर्ण

**६१.** आपत्तीत बळी पडलेल्या व्यक्तींना, नुकसानभरपाई व मदत देताना, लिंग, जात, समूह, वंश किंवा धर्म या कारणावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. **भेदभाव करण्यास मनाई.**

**६२.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आपत्ती व्यवस्थापनामध्ये सुविधा पुरवण्यासाठी किंवा साहाय्य करण्यासाठी भारत सरकारच्या मंत्रालयांना किंवा विविध विभागांना, किंवा राष्ट्रीय कार्यकारी समितीला किंवा राज्य शासनाला, राज्य प्राधिकरणाला, राज्य कार्यकारी समितीला, वैधानिक संस्थांना किंवा यथास्थिति, त्यांच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना लेखी निदेश देणे हे, केंद्र सरकारसाठी कायदेशीर असेल आणि अशा मंत्रालयाने किंवा विभागाने किंवा शासनाने किंवा प्राधिकरणाने, कार्यकारी समितीने, वैधानिक संस्थेने, अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने अशा निदेशांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल. **केंद्र सरकारचा निदेश देण्याचा अधिकार.**

**६३.** जेव्हा राष्ट्रीय कार्यकारी समितीने, कोणत्याही राज्य कार्यकारी समितीने किंवा जिल्हा प्राधिकरणाने किंवा या बाबतीत अशा समितीने किंवा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपत्तीस प्रतिबंध करण्याच्या किंवा आपत्ती निवारण करण्याच्या अथवा बचाव किंवा मदत कार्य करण्याच्या संबंधातील कोणतीही **बचाव कार्यांसाठी कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे अधिकार.**

कामे पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्याची विनंती केली असेल तेव्हा, केंद्र सरकारचा किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी, त्या विनंतीनुसार, अशा समितीला किंवा प्राधिकरणाला किंवा व्यक्तीला असे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देईल.

**विशिष्ट परिस्थितीत नियम, इत्यादी करणे किंवा त्यात सुधारणा करणे.**

**६४.** जर, आपत्तींस प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यांचे निवारण करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही नियमाच्या, विनियमाच्या, अधिसूचनेच्या, मार्गदर्शक तत्त्वांच्या, सूचनेच्या, आदेशाच्या, योजनेच्या किंवा, यथास्थिति, उपविधीच्या तरतुदी करणे किंवा त्यात सुधारणा करणे आवश्यक असल्याचे राष्ट्रीय कार्यकारी समितीस, राज्य कार्यकारी समितीस किंवा, यथास्थिति, जिल्हा प्राधिकरणास दिसून आले असेल तर, ती, या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, अशा नियमांची, विनियमांची, अधिसूचनेची, मार्गदर्शक तत्त्वांची, सूचनेची, आदेशाची, योजनेची किंवा, यथास्थिति, उपविधींची सुधारणा करण्यास फर्मावील, आणि या आवश्यकतांचे पालन करण्यासाठी समुचित विभाग किंवा प्राधिकरण आवश्यक ती कारवाई करील.

**बचाव कार्ये, इत्यादींसाठी संसाधने, अन्नसामग्री, वाहने, इत्यादींचे अधिग्रहण करण्याचा अधिकार.**

**६५.** (१) जर,—

(क) तत्परतेने प्रतिसाद देण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा व्यक्तीच्या कोणत्याही संसाधनांची गरज आहे ;

(ख) बचाव कार्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही जागेची गरज आहे किंवा गरज भासण्याचा संभव आहे ; किंवा

(ग) आपत्तीग्रस्त क्षेत्रांतून संसाधने वाहून नेण्याच्या किंवा आपत्तीग्रस्त क्षेत्रात संसाधने घेऊन जाण्याच्या किंवा बचाव, पुनर्वसन किंवा पुनर्रचना करण्याच्या संबंधात वाहतूक करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही वाहनाची गरज आहे किंवा गरज भासण्याचा संभव आहे,

असे राष्ट्रीय कार्यकारी समितीस, राज्य कार्यकारी समितीस किंवा जिल्हा प्राधिकरणास किंवा, यथास्थिति, याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास दिसून आले असेल तर, अशा प्राधिकरणास, लेखी आदेशाद्वारे, अशी संसाधने किंवा जागा किंवा, यथास्थिति, अशी वाहने अधिग्रहीत करता येतील, आणि असे अधिग्रहण करण्याच्या संबंधात, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल असे आणखी आदेश देऊ शकेल.

(२) जेव्हा जेव्हा, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही संसाधने, जागा किंवा वाहने अधिग्रहीत केली जातात तेव्हा तेव्हा, असा अधिग्रहणाचा कालावधी, त्या पोट-कलमामध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी ज्या कालावधीकरिता अशी संसाधने, जागा, किंवा वाहने आवश्यक असतील, त्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी वाढविण्यात येणार नाही.

(३) या कलमामधील,–

(क) "संसाधने" या संज्ञेत, पुरूष आणि भौतिक संसाधनांचा समावेश होतो ;

(ख) "सेवा" या संज्ञेत, सोईसुविधांचा समावेश आहे ;

(ग) "जागा" याचा अर्थ, कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग, असा आहे आणि त्यामध्ये, झोपडी, छपरी किंवा इतर संरचना किंवा त्यांचा कोणताही भाग यांचा समावेश होतो ;

(घ) "वाहन" याचा अर्थ, वाहतुकीच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे किंवा वापरले जाण्यास सक्षम असलेले असे, कोणतेही वाहन,—मग ते यांत्रिक शक्तीद्वारे किंवा अन्य प्रकारे चालविले जात असो, असा आहे ;

**नुकसानभरपाईच्या रकमेचे प्रदान.**

**६६.** (१) जेव्हा जेव्हा कलम ६५ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही समिती, प्राधिकरण किंवा अधिकारी त्या कलमानुसार, कोणतीही जागा अधिग्रहीत करील तेव्हा तेव्हा, पुढील बाबी विचारात घेऊन जी निर्धारित करण्यात येईल अशा रकमेची नुकसानभरपाई हितसंबंधित व्यक्तींना प्रदान करण्यात येईल :–

(एक) त्या जागेच्या बाबतीत प्रदेय असलेले भाडे, किंवा जर त्या जागेसाठी असे भाडे प्रदेय नसेल तर, त्या वसतिस्थानातील तत्सम जागेसाठी प्रदेय असलेले भाडे ;

(दोन) जर जागा अधिग्रहीत केल्याच्या परिणामी, हितसंबंधित व्यक्तीला तिचे निवासस्थान किंवा धंद्याची जागा बदलणे भाग पडले असेल तर, असा बदल करण्यासाठी आनुषंगिक असलेला वाजवी खर्च (कोणताही असल्यास) :

परंतु, जेव्हा अशा प्रकारे निर्धारित केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेने व्यथित झालेल्या कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने, ती बाब लवादाकडे निर्दिष्ट करण्यासाठी तीस दिवसांच्या आत केंद्र सरकारकडे किंवा, यथास्थिति, राज्य शासनाकडे अर्ज केला असेल त्याबाबतीत, प्रदान करावयाची नुकसानभरपाईची रक्कम ही, याबाबतीत केंद्र सरकारने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने नियुक्त केलेला लवाद निर्धारित करील त्याप्रमाणे असेल :

परंतु आणखी असे की, जेव्हा नुकसानभरपाईची रक्कम स्वीकारण्याच्या मालकीहक्कासंबंधी किंवा नुकसानभरपाईच्या रकमेच्या संविभाजनासंबंधी कोणताही विवाद असेल त्याबाबतीत, तो विवाद, निर्णयासाठी, याबाबतीत केंद्र सरकारने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने नियुक्त केलेल्या लवादाकडे केंद्र सरकारद्वारे किंवा, यथास्थिति, राज्य शासनाद्वारे निर्दिष्ट करण्यात येईल आणि अशा लवादाच्या निर्णयानुसार निर्धारित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमामध्ये “हितसंबंधित व्यक्ती” या शब्दप्रयोगाचा अर्थ, अधिग्रहण करण्याच्या लगतपूर्वी कलम ६५ अन्वये अधिग्रहीत केलेल्या जागांचा प्रत्यक्ष कब्जा जिच्याकडे होता ती व्यक्ती, किंवा जेव्हा कोणत्याही व्यक्तीकडे असा प्रत्यक्ष कब्जा नसेल त्याबाबतीत, अशा जागेचा मालक, असा आहे.

(२) जेव्हा जेव्हा कलम ६५ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही समिती, प्राधिकरण, किंवा अधिकारी, त्या कलमानुसार कोणतेही वाहन अधिग्रहीत करील तेव्हा तेव्हा अशा वाहनाच्या भाड्यासाठी त्या वसतिस्थानामध्ये प्रचलित असलेल्या भाड्यांच्या किंवा दरांच्या आधारे केंद्र सरकारकडून किंवा, यथास्थिति, राज्य शासनाकडून जी निर्धारित करण्यात येईल अशा रकमेची नुकसानभरपाई त्या वाहनाच्या मालकाला प्रदान करण्यात येईल :

परंतु, जेव्हा अशा प्रकारे निर्धारित केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेने व्यथित झालेल्या अशा वाहनाच्या मालकाने ती बाब लवादाकडे निर्दिष्ट करण्यासाठी केंद्र सरकारकडे किंवा, यथास्थिति, राज्य शासनाकडे विहित मुदतीच्या आत अर्ज केला असेल. त्याबाबतीत, प्रदान करावयाची नुकसानभरपाईची रक्कम ही, याबाबतीत केंद्र सरकारने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने नियुक्त केलेला लवाद निर्धारित करील त्याप्रमाणे असेल :

परंतु आणखी असे की, जेव्हा वाहन किंवा जलयान अधिग्रहीत करण्याच्या लगतपूर्वी भाडे-खरेदी करारनाम्याच्या आधारे, मालकाव्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या कब्जात असेल त्याबाबतीत, अधिग्रहणाच्या संबंधात प्रदेय असलेली एकूण नुकसानभरपाई म्हणून या पोट-कलमान्वये निर्धारित केलेली रक्कम ही, ती व्यक्ती व मालक यांच्यामध्ये मान्य होईल अशा रीतीने संविभाजित करण्यात येईल, आणि ते मान्य नसल्यास, याबाबतीत केंद्र सरकारने किंवा, यथास्थिति, राज्य शासनाने नियुक्त केलेला लवाद निर्णय देईल अशा रीतीने संविभाजित करण्यात येईल.

**इशारा, इत्यादी, कळविण्यासाठी प्रसार माध्यमांना निदेश देणे.**

**६७.** राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण, कोणत्याही धोकादायक आपत्कालीन परिस्थितीसंबंधात किंवा आपत्तीसंबंधात कोणताही इशारा किंवा सूचना देण्याकरिता जे उपलब्ध असेल असे कोणतेही दृक किंवा दृकश्राव्य माध्यम किंवा संपर्काची अशी अन्य साधने नियंत्रणात असलेल्या कोणत्याही प्राधिकरणाला किंवा व्यक्तीला निदेश देण्यासाठी शासनाकडे शिफारस करू शकेल, आणि नियत केल्याप्रमाणे उक्त संपर्क साधने व प्रसार माध्यमे अशा निदेशाचे अनुपालन करतील.

**आदेशांचे किंवा निर्णयांचे अधिप्रमाणन.**

**६८.** राष्ट्रीय प्राधिकरणाचा, किंवा राष्ट्रीय कार्यकारी समितीचा, राज्य प्राधिकरणाचा, किंवा राज्य कार्यकारी समितीचा किंवा जिल्हा प्राधिकरणाचा प्रत्येक आदेश किंवा निर्णय हे, याबाबतीत प्राधिकृत करण्यात येतील, अशा राष्ट्रीय प्राधिकरणाच्या किंवा राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या, किंवा राज्य कार्यकारी समितीच्या, किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

**अधिकार सोपविणे.** **६९.** राष्ट्रीय कार्यकारी समितीस, किंवा, यथास्थिति, राज्य कार्यकारी समितीस, लेखी स्वरूपातील सर्वसाधारण किंवा, विशेष आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटत असतील असे या अधिनियमाखालील तिचे अधिकार व कार्य, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा शर्तीच्या किंवा मर्यादांच्या, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, अध्यक्षाकडे किंवा कोणत्याही सदस्यांकडे किंवा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

**वार्षिक अहवाल.** **७०.** (१) राष्ट्रीय प्राधिकरण, प्रत्येक वर्षातून एकदा, मागील वर्षामधील त्याच्या कामांचा खरा व संपूर्ण लेखाजोखा देणारा वार्षिक अहवाल, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा मुदतीत तयार करील व त्याच्या प्रती, केंद्र सरकारकडे पाठवण्यात येतील आणि ते सरकार, तो अहवाल, तो मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

(२) राज्य प्राधिकरण, प्रत्येक वर्षातून एकदा, मागील वर्षामधील त्याच्या कामांचा खरा व संपूर्ण लेखाजोखा देणारा वार्षिक अहवाल, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा मुदतीत तयार करील व त्याच्या प्रती, राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील आणि ते शासन, तो अहवाल, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे त्या राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर आणि जेथे असे विधानमंडळ एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे, त्या एका सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील.

**न्यायालयाच्या अधिकारितेस रोध.** **७१.** कोणत्याही न्यायालयास (सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय या खेरीज), केंद्र सरकारने, राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य शासनाने, राज्य प्राधिकरणाने किंवा जिल्हा प्राधिकरणाने या अधिनियमाद्वारे त्यांच्या कार्यांच्या संबंधात किंवा त्याद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारानुसार केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या, केलेल्या कार्यवाहीच्या, दिलेल्या आदेशाच्या, निदेशाच्या, अनुदेशाच्या किंवा मार्गदर्शक तत्त्वांच्या बाबतीत, कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करून घेण्याची अधिकारिता असणार नाही.

**अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.** **७२.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही संलेखामध्ये अंतर्भूत असलेली त्यातील कोणतीही गोष्ट, विसंगत असली तरी, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात असतील.

**सद्भावनापूर्वक केलेली कृती.** **७३.** या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा विनियमांन्वये केंद्र सरकारने किंवा राष्ट्रीय प्राधिकरणाने किंवा राज्य शासनाने किंवा राज्य प्राधिकरणाने किंवा जिल्हा प्राधिकरणाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने अथवा केंद्र सरकारच्या किंवा राष्ट्रीय प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा राज्य प्राधिकरणाच्या किंवा जिल्हा प्राधिकरणाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने अथवा अशा शासनाकरिता किंवा प्राधिकरणाकरिता त्याच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्यात आले असल्याचे अभिप्रेत असलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही कामाच्या संबंधात, असे प्राधिकरण किंवा शासन किंवा असा अधिकारी किंवा कर्मचारी किंवा अशी व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**कायदेशीर प्रक्रियेपासून उन्मुक्ती.** **७४.** केंद्र सरकारचा, राष्ट्रीय प्राधिकरणाचे, राष्ट्रीय कार्यकारी समितीचे, राज्य शासनाचे, राज्य प्राधिकरणाचे, राज्य कार्यकारी समितीचे किंवा जिल्हा प्राधिकरणाचे अधिकारी किंवा कर्मचारी हे, त्यांच्या पदीय क्षमतेत कळविलेल्या किंवा प्रसारित केलेल्या कोणत्याही निकटवर्ती आपत्तीच्या बाबतीतील इशाऱ्याच्या किंवा अशा कळविण्याच्या किंवा प्रसारित करण्याच्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या कोणत्याही कारवाईच्या किंवा दिलेल्या निदेशाच्या संबंधातील कायदेशीर प्रक्रियेपासून उन्मुक्त असतील.

**केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.** **७५.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी, तरतूद करता येईलः–

(क) कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये राष्ट्रीय प्राधिकरणाची रचना व त्याच्या सदस्यांची संख्या, आणि पोट-कलम (४) अन्वये राष्ट्रीय प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(ख) कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये सल्लागार समितीच्या सदस्यांना प्रदान करावयाचे भत्ते ;

(ग) कलम ८ च्या पोट-कलम (३) अन्वये राष्ट्रीय कार्यकारी समितीच्या अध्यक्षांचे अधिकार व कार्ये आणि कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये तिच्या अधिकारांचा वापर करताना आणि तिची कार्ये पार पाडताना, राष्ट्रीय कार्यकारी समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(घ) कलम ९ च्या पोट-कलम (३) अन्वये राष्ट्रीय कार्यकारी समितीने घटित केलेल्या उप-समित्यांशी सहयोगी असलेल्या व्यक्तींना प्रदान करावयाचे भत्ते ;

(ङ) कलम ४२ च्या पोट-कलम (२) अन्वये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या सदस्यांची संख्या, पोट-कलम (३) अन्वये सदस्यांचा पदावधी व त्या सदस्यांमधील रिक्त जागा आणि अशा रिक्त जागा भरण्याची रीत आणि पोट-कलम (४) अन्वये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे नियामक मंडळ घटित करण्याची रीत ;

(च) कलम ४४ च्या पोट-कलम (२) अन्वये, दल घटित करण्याची रीत, शिस्तभंगविषयक तरतुदींसह त्या दलाच्या सदस्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(छ) कलम ६० च्या खंड (ख) अन्वये राष्ट्रीय प्राधिकरणाकडे, राज्य प्राधिकरणाकडे, केंद्र सरकारकडे, राज्य शासनाकडे किंवा इतर प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे, अपराधाची व त्याबाबत तक्रार करण्याचा इरादा असल्याची नोटीस देण्याची रीत;

(ज) कलम ७० अन्वये, ज्या नमुन्यात व ज्या मुदतीत वार्षिक अहवाल तयार करावयाचा आहे तो नमुना व ती मुदत;

(झ) विहित करावयाची आहे, किंवा विहित करता येईल अशी, किंवा ज्या बाबतीत नियमांद्वारे तरतूद करावयाची असेल, अशी अन्य कोणतीही बाब.

**विनियम करण्याचा अधिकार.**

**७६.** (१) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेस, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असतील असे विनियम, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा विनियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:–

(क) नियामक मंडळाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कार्ये ;

(ख) नियामक मंडळाने, त्याच्या अधिकारांचा वापर करताना व त्याची कार्ये पार पाडताना, अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ग) ज्यासाठी या अधिनियमान्वये विनियमांद्वारे तरतूद करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

**नियम व विनियम संसदेसमोर ठेवणे.**

**७७.** या अधिनियमाखाली केंद्र सरकारने केलेला प्रत्येक नियम आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेने केलेला प्रत्येक विनियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम केवळ अशा फेरबदल केलेल्या रूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे यापूर्वी त्या नियमान्वये किंवा विनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.**

**७८.** (१) राज्य शासनास, या अधिनिमाच्या तरतुदी पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांत, पुढील सर्व किंवा त्या कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :–

(क) कलम १४ च्या पोट-कलम (२) अन्वये राज्य प्राधिकरणाची रचना व त्याच्या सदस्यांची संख्या, आणि पोट-कलम (५) अन्वये राज्य प्राधिकरणाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(ख) कलम १७ च्या पोट-कलम (२) अन्वये सल्लागार समितीच्या सदस्यांना प्रदान करावयाचे भत्ते ;

(ग) कलम २० च्या पोट-कलम (३) अन्वये राज्य कार्यकारी समितीच्या अध्यक्षाचे अधिकार व कार्ये, आणि पोट-कलम (४) अन्वये राज्य कार्यकारी समितीने तिच्या अधिकारांचा वापर करताना व तिची कार्ये पार पाडताना, अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(घ) कलम २१ च्या पोट-कलम (३) अन्वये राज्य कार्यकारी समितीने घटित केलेल्या उप-समितीशी सहयोगी असलेल्या व्यक्तींना प्रदान करावयाचे भत्ते;

(ङ) कलम २५ च्या पोट-कलम (२) अन्वये जिल्हा प्राधिकरणाची रचना व त्याच्या सदस्यांची संख्या, आणि पोट-कलम (३) अन्वये जिल्हा प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने वापर करावयाचे अधिकार आणि त्याने पार पाडावयाची कार्ये ;

(च) कलम २८ च्या पोट-कलम (३) अन्वये जिल्हा प्राधिकरणाने तज्ज्ञ म्हणून घटित केलेल्या कोणत्याही समितीशी सहयोगी असलेल्या व्यक्तींना प्रदेय असलेले भत्ते ;

(छ) विहित करावयाची आहे किंवा विहित करता येईल अशी किंवा ज्या बाबतीत नियमांद्वारे तरतूद करावयाची आहे, अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाअन्वये, राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे त्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल किंवा जेथे ते एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे त्या एका सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**७९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, केंद्र सरकारला किंवा, यथास्थिति, राज्य शासनाला, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असा, या अधिनिमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेला आदेश, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे काढता येईल :

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या समाप्तीनंतर काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या किंवा, यथास्थिति, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर, ठेवण्यात येईल.